www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३१ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, गुरूवार, ०६ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### ठाण्यातील भास्कर कॉलनीच्या रस्त्याजवळील अवाढव्य होर्डिंग काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना साकडे !

● ठाणे, रोहित जैसवाल :

येथील नौपाडा परिसरातील भास्कर कॉलनीच्या भर वस्तीत सिताराम भुवन या जुन्या इमारतीत फ्लड लाइट्स लावलेले आवाढव्य जाहिरात फलक (होल्डींग) व त्यावरील मोठमोठ्या लाईटमुळे परिसरात उष्णतामान वाढवले जात आहे.

हा प्रखर प्रकाश रहिवाशांच्या घरात येत असल्याने त्यांना त्रास होतो. याशिवाय या होल्डींगमुळे घाटकोपरच्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त करून येथील हाऊसिंग सोसायटींमधील रहिवाश्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यावर वेळीच उपाययोजना करून होल्डीग हटवण्याची मागणी रहिवाश्यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांसह ठाणे महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

भास्कर कॉलनीच्या सर्विस रोडला लागून चार मजली जुनी सिताराम भवन ही इमारत आहे. या इमारती लगत अवाढव्य जाहिरात होर्डिंग उभारण्यात आले आहे.

पान २ वर

# नाल्यातील गाळ रस्त्यावर दिसल्यास कारवाई करणार, ठेकेदारासह अधिका-यांना केडीएमसी आयुक्तांची तंबी

● ठाणे, यश सावंत :



कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील नालेसफाईचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. नालेसफाईनंतर काढण्यात आलेला गाळ हा रस्त्यालगत ठेवला जातो. गाळ वेळेवर न उचलल्याने रस्त्यासह परिसरात अस्वच्छता दुर्गंधी पसरते. बुधवारी महापालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांनी हा गाळ तात्काळ उचला, गाळ रस्त्यालगत आढळून आल्यास ठेकेदारासह अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील नालेसफाईच्या कामकारीता 3 कोटी 50 लाख रुपये खर्चाच्या निविदा मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यासाठी महापालिकेच्या दहा प्रभाग क्षेत्राकरीता करिता प्रत्येकी एक या प्रमाणे दहा कंत्राटदारांची नियुक्ती केली आहे.

एप्रिल महिन्यापासून नालेसफाईची कामे सुरु आहेत. नालेसफाईचे काम ८० टक्के पूर्ण झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केलाय. नालेसफाईच्या कामाची पाहणी यापूर्वी कल्याण पश्चिमेचे शिवसेना आमदार विश्वनाथ भोईर, कल्याण पूर्वेचे भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड आणि शिवसेनेचे कल्याण पूर्वेचे शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी केली होती. या तिन्ही लोकप्रतिनिधींनी महापालिकेच्या नालेसफाईच्या कामाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. बुधवारी महापालिका आयुक्त इंदूराणी जाखाड यांनी नालेसफाईच्या कामाची पाहणी केली.

पान २ वर

# शिवराज्याभिषेक सोहळयाकरीता रायगड पोलीस प्रशासन सज्ज



● अलिबाग, दिगंबर जाधव :

6 जून रोजी साजऱ्या होणाऱ्या 351 व्या शिवराज्याभिषेक सोहळयाकरीता रायगड पोलीस प्रशासन सज्ज झाले आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहणा-या शिवभक्तांस आपली सेवा देण्याकरीता "सदैव सेवेसी तत्पर" हया रायगड पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याने रायगड पोलीस सज्ज झाले असुन सोहळयाकरीता जवळपास 1400 पोलीस अधिकारी व अंमलदार बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेले आहेत.

शिवराज्याभिषेक सोहळा निर्विघ्न पार पाडावा तसेच कोणताही अनुचित प्रकार घडु नये याची सर्वातोपरी काळजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जबाबदारी अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे अपर पोलीस अधीक्षक रायगड यांनी घेतली आहे.

पान २ वर

# "यापुढे मुस्लिमांना संधी देताना विचार करावा लागेल", मायावतींचे उद्विग्न बोल



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळालं असलं तरी भारतीय जनता पार्टीला केवळ २४० जागा मिळवता आल्या आहेत. भाजपाचे मित्र पक्ष असलेल्या टीडीपी आणि नितीश कुमार यांच्या जेडीयू पक्षाला बरोबर घेऊन नरेंद्र मोदी सरकार स्थापन करतील. असं असंल तरी भारतीय जनता पार्टीने ४०० पारचा नारा दिला होता. मात्र, ४०० पारचं भाजपाचं स्वप्न भंगलं. तर इंडिया आघाडीला २३२ जागा मिळल्या आहेत. उत्तर प्रदेशमध्ये भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. कारण उत्तर प्रदेशात लोकसभेच्या एकूण ८० जागा आहेत. त्यापैकी निम्याही जागा भाजपाला मिळवता आल्या नाहीत.

तसेच लोकसभा निवडणुकीत बहुजन समाज पक्षालाही मोठा धक्का बसला आहे. मायावती यांच्या पक्षाला यश मिळवता आलं नाही. उत्तर प्रदेशातील ८० जागांपैकी एकही जागा बसपाला जिंकता आलेली नाही. त्यामुळे यावर मायावती यांनी उद्विग्न प्रतिक्रिया दिली.

पान २ वर

# अखंडीत वीज समस्येसाठी वीजग्राहक, महावितरण कंपनीच्या अधिका-यांची तळोजात बैठक

● पनवेल, भावना जैन :




तळोजा वसाहतीमधील फेज २ मधील शेकडो वीज ग्राहकांना अखंडीत वीज समस्येला तोंड द्यावे लागल्याने निवडणूकीची आचारसंहिता सूरु असताना नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. १० जून रोजी वीजग्राहक आंदोलन करण्यापूर्वी बुधवारी वीज महावितरण कंपनीच्या अधिका-यांनी तळोजा येथील उपकेंद्रात वीजग्राहकांसोबत यासंदर्भात घेतलेल्या बैठकीमध्ये लवकरच वीज खंडीत समस्या उद्भवू नये यासाठी कामे हाती घेतलयाचे आश्वासन दिले. तसेच विजेबाबत विविध समस्येवर महावितरण लवकरच तोडगा काढेल असेही या बैठकीत सांगण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी पुकारलेले आंदोलन स्थगित करत असल्याचे जाहीर केले.

मागील चार महिन्यांपासून वारंवार तळोजा फेज दोनमधील वीज गायब होत असल्याने येथील नागरिकांना गावखेड्यात राहत असल्याचा अनुभव मिळाला. वाढीव वीज देयक कमी करण्यासाठी वीजग्राहकांना वसाहतीमध्येच सोय करावी अशी मागणी ग्राहकांची होती. महावितरण कंपनीचे अतिरीक्त कार्यकारी अभियंता देवीदास बैयकर यांनी वसाहतीमध्ये ८ नवीन रोहीत्र बसविण्याचे काम सूरु असल्याचे नागरिकांच्या बैठकीत सांगीतले.

पान २ वर

# राज्यात शनिवारपासून पुढील तीन दिवस बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडणार

● पुणे, अभिजित येरल्लू :



मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती आहे. बुधवारी (५ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होणे अपेक्षित होते. पण, प्रत्यक्षात मोसमी पाऊस गोव्यातच अडखळला आहे. गुरुवारी( ६ जून) तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवारपासून (८ जून) पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पाऊस मंगळवारी (४ जून) गोव्यात दाखल झाला होता. मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे बुधवारी (५ मे) तळकोकणात पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. प्रत्यक्षात पाऊस गोव्यातच अडखलला आहे. सिंधुदुर्गमध्ये बुधवारी ढगाळ वातावरण तयार झाले होते. तापमानात घटही झाली आहे. सिंधुदुर्गमध्ये काही ठिकाणी हलका पाऊसही झाला. पण, तो पूर्वमोसमी होता. गुरुवारी (६ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

पान २ वर

# केंद्रात पुन्हा मोदी सरकार; नितीश कुमार आणि चंद्रबाबू नायडूंनी भाजपला समर्थन पत्रे सोपवली

● मुंबई, विशाल कारंडे :



लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर बहुमत गाठता आले नाही, पण मित्रपक्षांच्या मदतीने त्यांनी बहुमताचा आकडा पार केला आहे. त्यामुळे आता दिल्लीत सरकार स्थापनेच्या हालचालींनाही वेग आला आहे.

नुकतीच दिल्लीत एनडीएची बैठक संपली, यात नरेंद्र मोदी यांना संसदीय दलाचा नेता म्हणून निवडण्यात आले. या बैठकीत नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांनी भाजपला समर्थनाची पत्रे दिली आहेत. म्हणजेच, नितीश आणि चंद्राबाबू यांच्याबाबत सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम लागला आहे. बुधवारी दि.5 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची भेट घेऊन आपला राजीनामा सुपूर्द केला. तसेच, लोकसभा भंग करण्याची विनंती केली. यानंतर सायंकाळी पंतप्रधानांच्या निवासस्थानी NDA ची तासाभरात बैठक झाली.

पान २ वर

# मुंबई शिक्षक मतदार संघात होणार चौरंगी लढत



● मुंबई, विशाल पाटील :

शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी बुधवारी शेकडो शिक्षकांच्या उपस्थितीत येत्या दि,26 जून रोजी विधान परिषदेच्या मुंबई शिक्षक मतदार संघातून शिक्षक, संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज कोकण भवन बेलापूर येथे दाखल केला. यावेळी समाजवादी गणराज्य पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार कपिल पाटील , जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा.डॉ. नीरज हातेकर, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, महाविद्यालयीन शिक्षकांच्या नेत्या ताप्ती मुखोपाध्याय, मधू परांजपे हे मान्यवर उपस्थित होते.

या मतदार संघातून उद्धव सेनेतून ज.मो.अभ्यंकर,भाजपा तून शिवनाथ दराडे,तर शिंदे सेनेतून शिवाजी शेंडगे आणि शिक्षक भारतीतून सुभाष मोरे यांनी निवडणूक अर्ज भरल्याने या मतदारसंघात चुरशीची चौरंगी लढत अपेक्षित आहे.

सर्व प्रस्थापित राजकीय पक्षांच्या उमेदवारांचा पराभव करून मोठ्या मताधिक्याने ते निवडून येतील असा विश्वास कपिल पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

पेन्शनच्या लढाईत यांनी सुभाष मोरे यांनी महत्वाची भूमिका बजावली होती.ते चेंबूरच्या अमरनाथ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजात सहाय्यक शिक्षक म्हणून काम करत आहेत.

पान २ वर

# मी कमी पडलो, महाराष्ट्रातील पराभवाची जबाबदारी स्वीकारतो": उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :




लोकसभा निवडणुकीचे निकाल भाजपासाठी अधिक धक्कादायक ठरले. गेल्या निवडणुकीपेक्षा भाजपाला मोठा फटका बसला. देशपातळीवर तसेच राज्यातही भाजपाला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्या. यानंतर मुंबईतील भाजपाच्या मुख्य कार्यालयात एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीनंतर भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकारांशी संवाद साधला. मी कमी पडलो, महाराष्ट्रातील पराभवाची जबाबदारी स्वीकारतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तयारीही दर्शवली.

देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने आरक्षण दिल्यानंतरही एक नरेटिव्ह करण्यात आला. त्यावर आम्ही प्रभावी उत्तर देऊ शकलो नाही. अनेक ठिकाणी त्याचा परिणाम झाला. मराठवाड्यात विशेष फटका बसला. शेतकऱ्यांचे प्रश्न असतील, त्याचा परिणाम झाला. उमेदवाराबाबतची नाराजी असेल, ती सुरुवातीला लक्षात आली नाही. मात्र, त्यानंतर ती हळूहळू लक्षात आली. त्यात आता पुढे सुधारणा करण्यात येईल. आम्ही जे प्रभावी काम केले आहे, ते पुढे नेण्याचे काम करू. प्रयत्न अधिक वाढवू, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक घेऊ. समन्वयाचे काही विषय असतील, त्यावर चर्चा करू. एकूणच या निवडणुकीत भाजपाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम काम केले आहे. आमच्या प्रदेशाध्यक्षांनी प्रचंड मेहनत केली. प्रचंड फिरले. तळागाळापर्यंत जाऊन कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे काम, संघटित करण्याचे काम प्रदेशाध्यक्षांनी केले. मुंबई अध्यक्षांनीही पक्ष सक्रीय ठेवला. आम्हाला जागा कमी पडल्या असल्या तरी दोन्ही अध्यक्षांचे चांगले काम या निवडणुकीत केले, त्याबाबत त्यांचे अभिनंदन करतो. कितीही आकडेवारी मांडली तरी जागा कमी आल्या ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. या निवडणुकीचे नेतृत्व भाजपाकडून एकप्रकारे मी केले. त्यामुळे जो काही पराभव झाला असेल आणि जागा कमी झाल्या असतील, याची सगळी जबाबदारी ही माझी आहे. ती मी स्वीकारतो. मी मान्य करतो की, मी यात कमी पडलेलो आहे. ती कमतरता पूर्ण करण्याचा प्रयत्न मी करणार आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाला जो काही सेटबॅक महाराष्ट्रात सहन करावा लागला. याची सगळी जबाबदारी मी देवेंद्र फडणवीस या ठिकाणी स्वीकारतो आहे. पक्षाला एक विनंती करणार आहे की, विधानसभेसाठी पूर्ण वेळ उतरायचे आहे.

पान २ वर

## संपादकीय

# काश्मीरमध्ये 'लोकशाही' ?

जम्मू-काश्मीरमध्ये चार दशकांनंतर यंदा लोकसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक मतदान झाले आहे. हा भाजप आणि केंद्र सरकारच्या धोरणांचा विजय मानायचा की, काश्मीर खोऱ्यातील जनतेची खदखद मतदानातून बाहेर पडली म्हणायचे? यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काश्मीर खोऱ्यातील एकाही जागेवर भाजपने उमेदवार उभा केला नाही. ही खरेतर भाजपची पळवाट म्हटली पाहिजे. भाजप लढत नसेल तर त्यांच्याविरोधात काश्मिरी जनतेने कौल दिला असे थेट म्हणता येत नाही. भाजपने निवडणूक लढवली असती आणि उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली असती तर भाजपला पराभवाची कारणे द्यावी लागली असती. पण उमेदवार नाही, जय-पराजयही नाही. उलट, आता मतदारांनी भरघोस मतदान केल्यामुळे काश्मिरी जनतेलाही लोकशाही प्रिय असल्याचे भाजपला उजळ माथ्याने सांगताही येऊ शकेल! एप्रिलमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी जम्मूमधील निवडणुकीच्या प्रचारसभेत सांगितले की, आम्हाला काश्मिरी जनतेची मने जिंकायची आहेत. खोऱ्यामध्ये कमळ फुलावे याची आम्हाला घाई नाही

तरीही काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला, श्रीनगर आणि अनंतनाग राजौरी या तीन लोकसभा मतदारसंघांमध्ये यावेळी झालेल्या मतदानाची तुलना १९८४ मधील मतदानाशी करता येऊ शकेल. त्यानंतर खोऱ्यात सुरू झालेला हिंसाचार अजूनही थांबलेला नाही. ऑगस्ट २०१९मध्ये केंद्र सरकारने काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर पहिल्यांदाच खोऱ्यात निवडणूक झाली आहे. काश्मिरी मतदार मतदानावर बहिष्कार टाकतील असे निवडणुकीपूर्वी बोलले जात होते. पण झाले नेमके उलटे. अनंतनाग-राजौरीमध्ये ५४.४६ टक्के मतदान झाले. २०१९ मध्ये जुन्या अनंतनाग मतदारसंघात केवळ ८.९८ टक्के मतदान झाले होते. यंदा श्रीनगरमध्ये ३८.४५ टक्के; तर बारामुल्लामध्ये ५९.१० टक्के मतदानाची नोंद झाली. २०१९ मध्ये या दोन्ही मतदारसंघामध्ये अनुक्रमे १४.४३ टक्के व ३४.६० टक्के मतदान झाले होते. आता १९८४ची आकडेवारी बघा. तीनही मतदारसंघामध्ये अनुक्रमे ७०.८ टक्के, ७३.५१ टक्के आणि ६१.०९ टक्के मतदान झाले होते. साधारण १९८५-८९ पासूनच बारामुल्ला, अनंतनाग हे दोन्ही जिल्हे दहशतवादाची केंद्रे मानली जातात. तिथे यंदा मात्र मतदारांनी रांगा लावून मतदान केले.

बारामुल्लामध्ये १९८४ व २०२४ या दोन्ही निवडणुकीतील मतटक्क्यातील फरक फक्त २ टक्के आहे. दोन्ही काळात दहशतवादाचे प्रमाण नीचांकी होते, तेव्हा मतदानाचा टक्का वाढला असे म्हणता येईल. पण यावेळी झालेले मतदान म्हणजे लोकांनी केंद्र सरकारविरोधात व्यक्त केलेला रागही असू शकतो. सहा-सात वर्षांपूर्वी खोऱ्यात लष्करी जवानांवर दगडफेक करून केंद्रविरोधात संताप उद्रेक होत असे. विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर दोन-अडीच वर्षांच्या काळात संपूर्ण खोरे टाळेबंदीत होते. त्यानंतर पुढील दोन वर्षांमध्ये लोकांना रस्त्यावर उतरून विरोध दर्शवता आला नाही. खोऱ्यात आता दगडफेक होत नाही, तेवढे बळ आत्ता तरी खोऱ्यामध्ये नाही. त्यामुळे कदाचित लोकांनी मतदान करून अप्रत्यक्षपणे खोऱ्यातील केंद्राच्या धोरणाबाबत मत व्यक्त केले, असाही अर्थ काढता येऊ शकेल! काश्मीरचा विशेषाधिकार काढून केंद्र सरकारने भाजपचा 'ऐतिहासिक' अजेंडा पूर्ण केला हे खरे असले तरी, हा निर्णय जम्मू- काश्मीरमधील जनतेला न विचारता घेण्यात आला आहे. जून २०१८ पासून इथे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. विधानसभा भंग झाल्यामुळे काश्मिरी जनतेला लोकशाही मार्गाने मत मांडण्याची संधी दिली गेलेले नाही. लोकांना खुलेपणाने बोलता येत नाही, उर्वरित भारताप्रमाणे रस्त्यावर उतरून विरोध प्रदर्शन करता येत नाही, आंदोलन करता येत नाही. मग, काश्मिरी जनतेने काय करायचे, हा प्रश्न केंद्र सरकार व मोदी- शहांनी सोडवलेला नाही. हा राज्याचा दर्जा हिसकावून घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन महिन्यांपूर्वी पहिल्यांदा श्रीनगरला भेट दिली. खोऱ्यात इतरही समस्या आहेत. बेरोजगारी, महागाई, विजेचा तुटवडा, रस्त्यांचा विकास अशा पायाभूत समस्यांनी खोरे ग्रस्त आहे. यावेळी मतदानासाठी बाहेर पडलेल्या महिलांची संख्या पाहिली तर या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज लक्षात येईल. श्रीनगरमध्ये महिलांच्या मतदानाचे प्रमाण (२०१९) १२.६७ वरून ३३.२१ टक्क्यांवर पोहोचले. बारामुल्लामध्ये ते ३१.७६ वरून ५५.६३ टक्के झाले. अनंतनाग-राजौरीतील आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. काश्मीर खोऱ्यात मतदारांनी दिलेला प्रतिसाद पाहता इथे तातडीने विधानसभेची निवडणूक घेण्याची आणि राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याची गरज स्पष्ट होते.



### आजची चित्रोळी

गोडी मनांला वेड लाविते
भान न उरतें देहाचे !
आस्वादी बरबटून जाते
सौख्य आंबा खाण्याचें !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### मुंबई शिक्षक मतदार संघात होणार...

शिक्षक भारतीच्या स्थापनेपासून विविध शैक्षणिक व सामाजिक आंदोलनात ते सहभागी असतात. शिक्षक भारतीच्या शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते शिक्षकांच्या उपस्थितीत लोकशाही मार्गाने त्यांची निवड झाली आहे.

माझी उमेदवारी कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात नसून कंत्राटिकरण आणि खाजगीकरण यांच्या विरोधात आहे. शाळा कॉलेज एडेड असो वा अन एडेड समान काम समान वेतन, समान पेन्शन आणि कॅशलेस आरोग्य योजना मिळवून देण्यासाठी मी ही निवडणूक लढवत असल्याचे मोरे यांनी सांगितले.

### मी कमी पडलो, महाराष्ट्रातील पराभवाची...

त्यामुळे भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वाला ही विनंती करणार आहे की, त्यांनी मला सरकारकडून मोकळे करावे आणि पक्षात पूर्णवेळ काम करण्यासाठी संधी द्यावी. जेणेकरून ज्या काही कमतरता राहिल्या आहेत. त्या पूर्ण करण्याच्या दृष्टिने मला काम करता येईल. अर्थात सरकारमधून बाहेर राहिलो तरी सरकारमध्ये आम्हाला जे काही करायचे आहे, ते ती आमची टीम करेल. या संदर्भात लवकरच पक्षाच्या वरिष्ठांना भेटणार आहे. ते सांगतील, त्यानुसार कारवाई करेन, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### राज्यात शनिवारपासून पुढील तीन दिवस...

हवामान विभागाने शनिवारी (८ जून) आणि रविवारी (९ जून) रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

सोमवारपर्यंत (१० जून) मोसमी पाऊस विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता राज्यभरात दाखल होईल. रविवार, सोमवार आणि मंगळवारी मुंबईसह किनारपट्टी आणि पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पुढील काही दिवस राज्यात पूर्वमोसमी पावसाचा जोर राहणार आहे. - डॉ. अनुपम कश्यपी, निवृत्त शास्त्रज्ञ, हवामान विभाग.

### अखंडीत वीज समस्येसाठी वीजग्राहक,...

तसेच वीजवाहिनी अतिरीक्त असावी यासाठी दूसरी वीज वाहिनी वसाहतीमध्ये टाकण्यात येणार असून तातडीने वीजदेयकांच्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक कार्यालयात सोय करण्याची प्रक्रीया महावितरण कंपनी लवकर करेल असेही आश्वासन अतिरीक्त अभियंता बैयकर यांनी दिले. नागरिकांनी महावितरण कंपनीच्या आश्वासनानंतर तुर्तसा आंदोलन मागे घेतले असे या बैठकीत जाहीर केले.

### "यापुढे मुस्लिमांना संधी देताना विचार...

"यापुढे मुस्लिमांना संधी देताना विचार करावा लागेल", असं मायावती यांनी म्हटलं. तसंच भविष्यात तिकीट देताना विचारपूर्वक निर्णय घेतला जाईल, असं सूचक विधानही त्यानी केलं.

"बहुजन समाज पक्षाने मुस्लिम समाजाला योग्य प्रतिनिधित्व दिलं. मात्र, तरीही पक्षाला यश मिळवता आलं नाही. त्यामुळे यापुढे पक्ष विचार करून योग्य तो निर्णय घेईल आणि तशा प्रकारे संधी देईल. जेणेकरून निवडणुकीत पक्षाचे मोठे नुकसान होणार नाही. आगामी निवडणुकीत मुस्लिम समाजाला निवडणुकीची संधी देण्याबाबत पक्ष सावध भूमिका घेईल", असं म्हणत मायावती यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बोलताना निराशा व्यक्त केली.

"बहुजन समाज पक्षाला आलेल्या या अपयशाचे सखोल विश्लेषण केल जाईल. तसेच पक्षाचे हित जपण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले जातील. तसेच दलित समाजाने दिलेल्या समर्थनाबद्दल त्यांनी यावेळी आभार व्यक्त केले. आपल्या पक्षाचा महत्त्वाचा भाग असलेल्या मुस्लिम समुदायाला या निवडणुकीत योग्य प्रतिनिधित्व देण्यात आलं. पण तरीही पक्षाला यश मिळालं नाही. त्यामुळे पक्षाचे फार नुकसान होऊ नये म्हणून पक्ष खूप विचार करून यापुडे संधी देईल", असं मायावती यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मायावती यांनी या लोकसभा निवडणुकीत जवळपास ३५ मुस्लिम उमेदवार दिले होते. मात्र,बहुजन समाज पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे.

### केंद्रात पुन्हा मोदी सरकार; नितीश कुमार...

या बैठकीत नितीश आणि चंद्राबाबू यांच्यासोबतच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पवन कल्याण, जयंत चौधरी, जीतन राम माझी, चिराग पासवान, अनुप्रिया पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रफुल्लपटेल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

या लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमताचा जादुई आकडा पार करता आला नाही. त्यामुळेच आता त्यांना मित्रपक्षांची गरज लागणार आहे. विशेष म्हणजे, जेडीयूचे नितीश कुमार आणि टीडीपीचे एन चंद्राबाबू नायडू एनडीए सरकार स्थापन करण्यात किंगमेकरची भूमिका बजावत आहेत. या निवडणुकीत भाजपने 240 जागा जिंकल्या, ज्या बहुमताच्या आकड्यापेक्षा 32 ने कमी आहे. तर, टीडीपी आणि जेडीयूकडे एकूण 28 जागा आहेत. भाजपच्या इतर मित्रपक्षांसोबत मिळून एनडीए बहुमताचा आकडा पार करेल. या बैठकीनंतर राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनीदेखील नरेंद्र मोदी यांना समर्थन असल्याचे जाहीर केले. सोशल मीडियावर पोस्ट करताना शिंदेंनी लिहिले की, 'लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीची आज दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकीत नरेंद्र मोदीजी यांचे या विजयाबद्दल अभिनंदन करून त्यांना पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. नितीशकुमार यांच्या जनता दल युनायटेड, चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगु देसम प्रमाणेच शिवसेनेनेही पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा देशात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन करण्यासाठी तयार असल्याचे सांगत जाहीर पाठींबा दिला,' असे ते म्हणाले.

### ठाण्यातील भास्कर कॉलनीच्या...

त्याचा आकार अंदाजे ४० फूट ४० फूट असल्याचा आंदाजही या रहिवाश्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात व्यक्त केला आहे. या होल्डींगच्या इमारतीजवळ हॉटेल, पानाचे दुकान, टायरवाला व सर्विस रोड हा सतत मोठ्या वर्दळीचा परिसर आहे. या भर नागरी वस्तीमध्ये अवाढव्य होर्डिंगच्या जाहिरातींबोर्डवर तब्बल वीस हाय पावरचे हॅलोजन लॅम्प लावलेले आहेत. त्यामुळे परिसरातील उष्णतेत वाढ झाली आहे. परिसरातील लगतच्या सर्व इमारतीमधील रहिवाशांना प्रखर प्रकाश घरात येत असल्याने त्यांना भयानक त्रास होत आहे. याशिवाय आगामी वादळी पावसादरम्यान घोटकोपरप्रमाणे या ठिकाणी सुद्धा मोठी घटना होण्याची भीती रहिवाश्यांनी व्यक्त करून तत्काळ होल्डीग हटवण्याची मागणी लावून धरली आहे.

या अवाढव्य होल्डींगमुळे दुर्दैवी घटना घडल्यास मोठी जीवित व वित्त हानी होण्याचा संभव आहे. त्यास आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन व महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेऊन होल्डींगवर तात्काळ कारवाई करण्यासाठी रहिवाशांनी कंबर कसली आहे. करदात्यांच्या जीवावर बेतणाऱ्या ह्या जाहिरात फलकांच्या आर्थिक उत्पनास वेळ प्रसंगी मुकावे लागले तरी तरी चालेल, संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी या भव्य होल्डींगला हलवण्याची मागणी टीएमसी आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्याचे जेष्ठ नागरिक महेंद्र मोने यांनी स्पष्ट केले.

### शिवराज्याभिषेक सोहळयाकरीता रायगड...

शिवराज्याभिषेक सोहळयाकरिता बाहेरील जिल्ह्यातून बंदोबस्त मागविण्यात आला असून बंदोबस्ताकरीता असलेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक अश्या काही उपयुक्त साहित्यांचे (खाजगी कीट) वाटप करण्यात आले. यात कॅप, मास्क , ब्रश, कोलगेट, ओडोमोस, एनर्जी पावडर पाऊच, मेडिकल जेल (पेन फ्री) आदी गोष्टींचा समावेश आहे. सोहळया दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास प्राथमिक पुर्व तयारी करण्यात आलेली आहे. आपातकालीन वेळेस प्राधान्याने लागणा-या लहान-लहान गोष्टींचा विचार करून पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक रायगड यांनी रायगड पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या कडुन पुर्व तयारी करून घेतली आहे. बंदोबस्तामध्ये लागणारे अत्यावश्यक असणा-या संरजामासहीत रायगड पोलीस प्रशासन शिवराज्याभिषेक सोहळा पार पाडण्यास सज्ज असुन सोहळयास येणा-या शिवभक्तांना देखील पोलीस प्रशासनाच्या वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणेबाबत आवाहन करण्यात आले आहे.

### नाल्यातील गाळ रस्त्यावर दिसल्यास...

त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी काही नागरिकांकडून नाल्यात कचरा टाकला जात असल्याची खंत व्यक्त केली. दरम्यान नाल्यातला गाळ काढून नाल्याच्या लगत ठेवला जातो. वेळेवर गाळ न उचलल्याने परिसरात दुर्गंधी अस्वच्छता पसरते. त्यामुळे संबंध ठेकेदाराने गाळ तत्काळ हटवला पाहिजे अन्यथा संबंधित ठेकेदारासह अधिकाऱ्यांवर देखील कारवाईचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# उघड्यावर अन्नपदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई करा !

पालिकेच्या अन्न व औषध विभागाच्या सूचनेनुसार उघड्यावर विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्स,गाड्या तसेच दुकानांना खाद्यपदार्थ झाकून ठेवणे बंधनकारक आहे. जाळीदार झाकणीने किंवा पारदर्शक प्लॅस्टिकने असे पदार्थ झाकून ठेवणे अपेक्षित असते; मात्र मुंबई-ठाण्यासारख्या प्रदूषित शहरात पालिकेच्या या नियमांची सर्रासपणे पायमल्ली होताना दिसते. आजमितीला प्रदूषणाच्या बाबतीत मुंबई शहर दिल्ली-कोलकातासारख्या शहरांशी स्पर्धा करत आहे. पावसाळा जवळ आल्याने मुंबईत अनेक ठिकाणी रस्त्यांची आणि उड्डाणपुलाची कामे युद्धपातळीवर सुरु आहेत तर अनेक ठिकाणी टोलेजंग इमारती उभारणीचे कामही जोमात सुरु आहे. या सर्वांतून हवेमध्ये मोठ्या प्रमाणात धुळीचे आणि मातीचे कण मिसळले जात आहेत. तर मुंबईतील वाढत्या वाहनसंख्येमुळे होणाऱ्या वायुप्रदूषणाने अगोदरच धोक्याची पातळी ओलांडली आहे. पावसाळयाच्या आरंभीच्या काळात विषाणूंची मोठ्या प्रमाणात पैदास होत असल्याने साथीचे आजार पसरतात. यंदाच्या जीवघेण्या उकाड्याने राज्यातील जनतेला जगणे नकोसे केले होते. आता पावसाच्या तोंडावर पसरणाऱ्या साथीच्या आजारांना रोखण्याचे आव्हान पालिका प्रशासनापुढे असणार आहे त्यासाठी उघड्यावर अन्नपदार्थ विकणाऱ्यांवर कायमस्वरूपी कारवाई करून पालिकेने मुंबईकरांना आश्वस्त करावे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# दुष्काळाची दाहकता

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दुष्काळाची दाहकता जाणवत आहे. गेल्या वर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे यावर्षी राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट आहे. दिवसेंदिवस दुष्काळाचे हे सावट आणखी गडद होत चालले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. संपूर्ण राज्यात दुष्काळाच्या झळा जाणवत आहे. धरणातील पाणी साठा कमी होत चालला आहे. अनेक धरणे कोरडी पडली आहेत. राज्यातील धरणात वीस टक्क्यांपेक्षा कमी पाणी साठा शिल्लक आहे. अनेक गावातील पाण्याची पातळी खालावली आहे. मराठवाड्यातील काही तालुक्यात तर पाण्याची पातळी तीन ते सहा मीटरने खालावली आहे. विहिरी, तलाव, नद्यांनी तर केंव्हाच तळ गाठला आहे. एक हंडा पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. राज्य सरकारने राबवलेल्या जलयुक्त शिवाय योजनेमुळे काही गावांना दिलासा मिळाला असला तरी टँकर मुक्त महाराष्ट्र हे राज्यसरकारचे स्वप्न अद्याप साकार झाल्याचे दिसत नाही. अनेक गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. एकट्या मराठवाड्यात शेकडो टँकर सुरू आहेत. राज्यातील करोडो नागरिकांवर पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. पिण्याच्या पाण्याची ही अवस्था तर शेतिसाठीच्या पाण्याचे काय ? पाण्याअभावी खरिपाचे पीके वाया गेली आहेत आता रब्बीचे पिकेही धोक्यात आहेत. पोटच्या पोरासारखे सांभाळले पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना चारा छावणीचा आधार घ्यावा लागत आहे. एकूणच या दुष्काळाने शेती उद्योगच धोक्यात आला आहे. पाण्याअभावी ग्रामीण भागातील नागरिक स्थलांतर करू लागले आहेत. पाणी नसल्याने उपवर मुलामुलींचे विवाह लांबले आहेत. एकूणच या दुष्काळाने राज्याची दैनावस्था झाली आहे. हा दुष्काळ १९७२ पेक्षाही भीषण आहे असे काही जाणकार सांगत आहेत. ही परिस्थिती मागील काही वर्षात सातत्याने दिसत आहे. सर्वाधिक जलसिंचन आणि धरणे महाराष्ट्रात असूनही महाराष्ट्राला नेहमीच दुष्काळाला सामोरे जावे लागत



आहे. ही जरी नैसर्गिक आपत्ती असली तरी याला आपणच जबाबदार आहोत. उपलब्ध पाण्याचा कसाही वापर करणे, पाणी वापराचं नियोजन नसणे, पावसाचं पाणी साठवण्यासाठी सहकार्य व नियोजनाचा अभाव, शेतकरी, उद्योगपती, व्यापारी, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांनी पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीची उपाययोजना न करणे, गरजेपेक्षा अधिक पाणी उपसा, वाळू उपसा, पाणी गळती यामुळे पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. वृक्षतोड, जंगल तोड यामुळे पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे त्यामुळे ऋतुचक्रही बदलले आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमानही वाढत चालले आहे. यावर्षी आपण त्याचा अनुभव घेतला आहे. जगातील सर्वात उष्ण शहरात देशासह राज्यातील काही शहरांचा समावेश होऊ लागला आहे. यावर्षी आपल्या राज्यातील सर्व शहरांचे सरासरी तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस इतके होते. दिल्ली राजस्थान येथील तापमानाच्या पाऱ्याने तर पन्नाशी ओलांडली आहे. चुकीच्या पीक पद्धतीमुळे जमिनीचा पोत कमी होऊ लागला आहे. लोकसंख्या जरी वाढत चालली असली तरी पाण्याचे साठे मर्यादित आहेत त्यामुळे पाण्याची टंचाई कायम जाणवत राहणार आहे. पाण्याचा वापर, पाण्याची साठवण आणि जिरवण आणि पुनर्भरण याबाबत आपण आज जर सावध झालो नाही तर आपल्याला भविष्यात खूप मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल एवढं निश्चित. इस्राईल सारखा छोटा देश अत्यल्प पाण्याचे नियोजन करून समृध्द बनू शकतो तर आपण का नाही ? इस्राईल पेक्षा आपल्या देशात खूप जास्त पाऊस पडतो. या पावसाच्या पाण्याचा संचय हा दुष्काळावर उपाय ठरू शकतो. त्यासाठी जलसंधारण योजना आखणे व ती पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. पावसाच्या पाण्याचा एक थेंबही वाया न जाऊ देता ते पाणी वाचवायला हवे. त्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगचा वापर करायला हवा. केवळ मोठ्या इमारतीतच नव्हे तर लहान घरातही विशिष्ट तंत्र वापरून पाणी साठवता येऊ शकते. सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, अस्थापने, दुकाने, बँका, सहकारी गृहनिर्माण सोसायट्या यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करायला हवे. वाढती वृक्षतोड थांबवून जास्तीतजास्त वृक्षलागवड करायला हवी. लावलेली वृक्ष जगवायाला हवे. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना एक वृक्ष लावायला देऊन त्याची वाढ करायला सांगावी. हवे तर यासाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यात यावे. चुकीच्या पीक पद्धती बदलायला हव्यात. ऊस, केळी यासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना ठिबक सिंचन सक्तीचे करायला हवे. श्रमदानातून जलसंधारणाची कामे करून जनतेचे प्रबोधन करायला हवे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालायला हवा. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीला आपणच जबाबदार असल्याने तिच्यावर मात करण्यासाठी सर्वांनी हातात हात घालून काम करायला हवे. दुष्काळ निवारण ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती आपल्या सर्वांचीच आहे. दुष्काळ निवारण्याच्या सरकारच्या प्रयत्नास आपण सर्वांनी साथ दिल्यास या भीषण आपत्तीवर मात करता येऊ शकेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## चंदनवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



● ठाणे (प्रतिनिधी) : दहावीचा निकाल लागल्यानंतर चंदनवाडी विभागातील रहिवाशी विद्यार्थी यांनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवले बद्दल डॉ. जितेंद्र आव्हाड व मा. खा. राजन विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली राजु चापले, रुपाली राजु चापले व अशोक चापले यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

यावेळ चंदनवाडी विभागात प्रथम गुण मिळविलेले कु. रितीका राजु जांभुळकर (94.20%), कु. रुषिकेश शिवाजी शेडगे (93.40), कु. श्लोका निलेश डफळ (90.80), कु. मानस अनिल मांढरे (84.80), कु. मुग्धा संतोष घोणे, कु. मंथन सुनिल गायकर, कु. हर्षल राम गाडे यांचा सत्कार समारंभ करुन पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित मा. ठामपा ज्येष्ठ नगरसेवक सुहास देसाई, विक्रम खामकर, प्रदिप शिंदे, दत्ता सावंत, जिवाजी कदम, एकनाथ आहिरे, श्री. सचिन पंधेरे, धोंडुराम मोरे, अजय जाधव, रत्नेश दुबे, मानसी पालवे व उत्तम पोंगडे यांनी कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चंद्रकांत चव्हाण यांनी केले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आंब्याच्या कोयी (Mango Seed) संकलित करण्यासाठी विशेष वाहने सज्ज

● नवी मुंबई प्रतिनिधी - 5 जून रोजीच्या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून आंब्याच्या कोयी (Mango Seeds) संकलनाची विशेष मोहीम राबविली जात असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात आलेले आहे.

नवी मुंबईतील सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॅरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून या आंब्याच्या कोयी संकलित करण्यासाठी दोन परिमंडळांसाठी स्वतंत्र वाहन तयार करण्यात आले असून कोयी संकलन मोहीम व्यापक प्रमाणात राबविण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे.




महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना या मोहीमेत सहभागी होण्याचे सर्व प्रसार माध्यमांतून आवाहन करण्यात आले असून आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आवाहन केलेली व्हिडिओ क्लिपही प्रसारित करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम या समाज माध्यमांवर तसेच व्हॉट्सअॅप संदेशांव्दारे नागरिकांकडून या अभिनव उपक्रमाचे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले असून नागरिक आपल्याकडील आंब्याच्या कोयी सुकवून महानगरपालिकेने कोयी संकलनासाठी तयार केलेल्या विशेष वाहनात देण्यासाठी उत्सुक आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने कोयी संकलनासाठी दोन विशेष वाहने सज्ज करण्यात आली असून प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वाहन कार्यरत आहे. परिमंडळ 1 चे वाहन बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे क्षेत्रातील तसेच परिमंडळ 2 चे वाहन कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा क्षेत्रातील आंब्याच्या कोयी सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॉरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून संकलित करीत आहेत.

■ या माध्यमातून ओला, सुका व घरगुती घातक अशा 3 प्रकारे वर्गीकरण होणा-या कच-यामधील आंब्याच्या कोयींचे स्वतंत्र वर्गीकरण होऊन त्याचा उपयोग पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी होणार आहे. 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'माझी वसुंधरा अभियान' या दोन्ही अभियानांना समर्पक असा हा उपक्रम आहे.

■ त्यामुळे नागरिकांनी आपल्याकडील आंब्यांचा आस्वाद घेतल्यानंतर उरलेल्या आंब्याच्या कोयी ((Mango Seed) नेहमीच्या ओल्या कच-यात टाकून न देता त्या एखाद्या भांड्यात पाण्याने धुवून स्वच्छ कराव्यात, उन्हात व्यवस्थित सुकवाव्यात आणि नवी मुंबई महानगरपालिकेने कोयी संकलनाची स्वतंत्र व्यवस्था केलेल्या विशेष वाहनात त्या द्याव्यात आणि महत्वाचे म्हणजे या माध्यमातून पर्यावरण संवर्धनात आपलाही सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# डोंबिवलीतील शिळफाटा रस्त्यावरील मेट्रोच्या रात्रभराच्या खोदाईने एमआयडीसीतील रहिवासी त्रस्त





● डोंबिवली प्रतिनिधी : गेल्या महिन्यापासून कल्याण-तळोजा मेट्रो मार्गाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महावर्दळीच्या शिळफाटा रस्त्यावर सोनारपाडा, विको नाका ते डोंबिवली नागरी सहकारी बँकेपर्यंत सुरू केले आहे. या कामासाठी शिळफाटा रस्त्यावर रात्रीच्या वेळेत अवजड यंत्रणेने खोदकाम केले जात आहे. या कर्णकर्कश आवाजाने झोपमोड होत असल्याने एमआयसीडी परिसरातील रहिवासी, उद्योजक, व्यापारी त्रस्त आहेत. या खोदकामामुळे रात्रभर मातीचा उधळा उडतो. तो रात्रभर परिसरातील घरांमध्ये उडून घरे, परिसर खराब करत असल्याच्या तक्रारी एमआयडीसीतील रहिवाशांकडून केल्या जात आहेत. एमआयडीसी भागात बहुतांशी रहिवासी नोकरदार, व्यावसायिक आहेत. रात्रीची शांत झोप घेऊन पुन्हा सकाळीच नोकरदार वर्गाला उठावे लागते. लोकांची रात्रीची झोपायची वेळ झाली की शिळफाटा रस्त्यावर खोदकाम सुरू होऊन कर्णकर्कश आवाज येतात.

या आवाजाचा सर्वाधिक त्रास लहान बाळे, बिछान्याला खिळून असणारे वृध्द, ज्येष्ठ नागरिक, मनोरुग्ण यांना सर्वाधिक होत आहे. एमआयडीसीतील अनेक रहिवाशांनी शिळफाटा रस्त्यावर खोदकाम करणाऱ्या ठेकेदाराची भेट घेऊन रात्रीच्या वेळेत कर्णकर्कश आवाज करत खोदकाम करू नका, अशी मागणी केली. ठेकेदाराने याविषयी रात्रीचे काम थांबवायचे असेल तर तुम्ही एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटा, असे रहिवाशांना सांगितले.

### झाडे तोडली

शिळफाटा रस्त्याच्या दुभाजकामध्ये नारळी, शोभेची अनेक झाडे लावण्यात आली होती. ही सर्व झाडे मुळासकट उपटून टाकण्यात आली आहेत. याविषयी पर्यावरणप्रेमी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. मेट्रोच्या कामासाठी ठाण्यातील घोडबंदर रस्ता जसा मागील दोन ते तीन वर्षापासून वाहनकोंडीत अडकत आहेत तीच परिस्थिती आता कल्याण शिळफाटा रस्त्यावर निर्माण होण्याची भीती प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे. या रस्त्यावरून जेवढी झाडे बाधित होणार आहेत. त्याच्या दुप्पट झाडे प्राधिकरणाने ठेकेदाराकडून लावून घेण्याची मागणी पर्यावरणप्रेमी नागरिक करत आहेत.

### शिळफाटा रस्त्याची तोडफोड

गेल्या तीन वर्षापूर्वी रस्तारूंदीकरण, सिमेंट काँक्रीटचा रस्ता, दुभाजक अशा नियोजनात बांधणी करण्यात आलेल्या शिळफाटा रस्त्याची मेट्रो कामासाठी पुन्हा उखळण करण्यात आल्याने प्रवासी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. या कामासाठी शिळफाटा रस्ता पुन्हा वाहनकोंडीत अडकू लागला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर 'मी करून दाखविले' हे लोकांना दाखविण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी डोंबिवली शहराच्या प्रवेशव्दारावर हे काम सुरू केले असल्याची चर्चा आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी या कामाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

■ तळोजा-कल्याण मेट्रो कामासाठी भूसंपादन झाले आहे. या मार्गाचे जे भूभाग मोकळे आहेत तेथे पहिले एमएमआरडीएने मेट्रोची कामे सुरू करावीत. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर दिखाव्याची कामे करून उगाच लोकांना त्रास होईल असे करू नये.

**-प्रमोद पाटील, आमदार, कल्याण ग्रामीण.**

■ शिळफाटा रस्त्यावर रात्रभर खोदकामाचा कर्णकर्कश आवाज येत असल्याने एमआयडीसीतील परिसरातील रहिवासी त्रस्त आहेत. ही कामे दिवसा किंवा अन्य भागात पहिले सुरू करावीत. शेवटच्या टप्प्यातील काम शिळफाटा रस्त्यावर करावे.

**- रमेश कुलकर्णी, रहिवासी.**

## संविधान बदलाच्या अपप्रचाराला जनता बळी पडली- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



● ठाणे प्रतिनिधी: आम्ही नेहमीच विकासाचे राजकारण केले, यापुढेही करणार आहोत; परंतु काहींनी संविधान बदलणार, असा अपप्रचार करून संभ्रम निर्माण केला. महायुती हा संभ्रम दूर करण्यात कमी पडली. त्याचबरोबर उमेदवारांची नावे उशिराने जाहीर झाली, त्याचाही परिणाम झाला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी व्यक्त केली. ठाणे मतदारसंघातील शिंदे सेनेचे उमेदवार नरेश म्हस्के विजयी झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत. काहींनी त्यांच्या विरोधात अपप्रचार केला. 'मोदी हटाव'चा नारा दिला. मात्र, जनतेने त्यांना तडीपार केले. केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येणार नाही.

गेल्या दोन वर्षांत महायुतीने राज्यात केलेला विकास आणि गेल्या १० वर्षांत मोदी यांनी देशाचा केलेला विकास, यामुळेच महायुतीला हे यश प्राप्त झाले. ठाण्यातील जनतेने म्हस्के यांच्या रूपाने बाळासाहेबांच्या खऱ्या शिवसेनेचा पहिला खासदार निवडून दिला आहे, असेही शिंदे म्हणाले. ठाणे हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. आनंद दिघे, बाळासाहेब ठाकरे यांचे प्रेम ठाण्यावर होते.

# मिस मिसेस कल्याण डोंबिवली स्पर्धेत निकिता घारे आणि श्रिया शिरवळकर अव्वल

● कल्याण प्रतिनिधी: ए आर व्हेंचर प्रस्तुत मिस मिसेस कल्याण डोंबिवली 2024 या कल्याण डोंबिवली शहरासाठी असणाऱ्या सौन्दर्यस्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच कल्याण येथील वाधवा मेडॉज बँकवेट येथे पार पडली. या स्पर्धेत मिस विभागात पहिला क्रमांक निकिता घारे, द्वितीय क्रमांक आफशा फातिमा तर तृतीय क्रमांक स्नेहा यादव हिने पटकावला. तसेच मिसेस विभागात पहिला क्रमांक श्रिया शिरवळकर, द्वितीय क्रमांक डॉ. सिद्धी रायबोले तर तृतीय क्रमांक रुपाली टावरे हिने पटकावला.



पूर्णिमा शिरिषकर यांची "झेप उद्योगिनीची" ही महिला उद्योजिकांची संस्था ह्या स्पर्धेची सहयोगी संस्था होती. या सौंदर्यस्पर्धेकरिता वेदीकलश, रुचिताज फूड हे सॅश पार्टनर, श्रयु क्रिएशन, आर्ट हार्वेस्ट हे क्राऊन पार्टनर तर सिंप्र हॉलिडेस हे ट्रॉफी पार्टनर होते. महाराष्ट्र श्रावणी २०२३ विजेत्या शालिनी सरपेस, नेहा वाघमारे, रश्मीता चित्रे, श्वेता सुरेश यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. NIFD GLOBAL कल्याण या नामांकित फॅशन इन्स्टिट्यूट ने या स्पर्धेचे औटफिट्स डिझाईन केले होते. या स्पर्धेआधी स्टार किड्स हा लहान मुलांसाठी असलेला फॅशन रनवे शो देखील संपन्न झाला. त्यात ५० हुन अधीक मुलांनी सहभाग घेतला होता. त्या स्पर्धेकरिता स्मार्ट कीड स्कूल हे सहयोगी संस्था होती.

ए आर व्हेंचर ही ठाणे स्थित फॅशन आणि ग्लॅमर संस्था असून ती नवरुणांना अभिनय आणि मॉडेलिंगचे प्रशिक्षण देऊन त्यांना या क्षेत्रात येण्याच्या संधी उपलब्द करून देत असते. या संस्थेचे अनेक कार्यक्रम मुंबई, ठाणे, नाशिक परिसरात होत असतात व त्यांनी प्रशिक्षण दिलेले अनेक विद्यार्थी आज मॉडेलिंग आणि अभिनय क्षेत्रात कार्यरत आहेत.

ए आर व्हेंचरच्या संस्थापिका डॉ अनुजा राव यांनी बोलताना असे सांगितले की मिस मिसेस कल्याण डोंबिवली २०२४ ही स्पर्धा कल्याण शहरातील अनेक तरुणींना मॉडेलिंग आणि अभिनयाची क्षेत्रे खुली करून देणारी स्पर्धा ठरणार आहे. ऑगस्ट मध्ये "महाराष्ट्र श्रावणी २०२४ ही राज्यस्तरीय सौंदर्यस्पर्धा होणार असून त्याद्वारे प्रत्येक स्पर्धकाला सेलेब्रिटी बरोबर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.






ठाणे - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण दक्षता मंडळ आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझा तलाव' ही ठाण्यातील ४३ तलावांच्या संवर्धनाची मोहीम सुरू करण्यात आली आहे या मोहिमेअंतर्गत कचराळी पाचपाखाडी,तलाव येथे मानवी साखळी तयार करून तलाव संवर्धन संदर्भात जनजागृती केली .

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त व्यापक लोकसहभागातून वृक्षारोपणाचे आयोजन

● नवी मुंबई प्रतिनिधी- जागतिक पर्यावरण दिननिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणा-या वृक्षारोपण मोहीमेत लोकसहभागावर विशेष भर दिला जात आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी करावयाच्या वृक्षारोपणाचा कृती आराखडा उद्यान विभागाने तयार केला असून 1.5 लाख देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात येणार आहे.




जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करावयाच्या वृक्ष लागवडीसाठी उद्यान विभागाकडे 35 हजारहून अधिक देशी वृक्षरोपे उपलब्ध असून व्यापक लोकसहभाग घेत या वृक्षरोपांची योग्य जागी लागवड करण्यात येत आहे.

ज्या नागरिकांना तसेच संस्थांना लागवडीसाठी वृक्षरोपांची आवश्कता असेल त्यांनी श्रीम.ऋतुजा गवळी, सहा.आयुक्त (उद्यान) यांना 7977630063 या क्रमांकावर तसेच श्री.प्रकाश गिरी, उद्यान अधिक्षक यांना 9322912801 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवहान सर्व माध्यमांतून करण्यात आले होते. या आवाहनास नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला असून वृक्षरोपे / वृक्षरोपणासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी 150 हून अधिक व्यक्ती / संस्था यांनी महानगरपालिका उद्यान विभागाकडे अर्ज दिले आहेत. नागरिक व संस्थांच्या मागणीनुसार त्यांना लागवडीसाठी 11 हजारहून अधिक देशी वृक्षारोपांचे वाटप करण्यात आले आहे तसेच त्यामधील काही जणांना लागवडीसाठी जागाही सूचित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना "आमची जमीन, आमचे भविष्य" अशी असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येत आहे. वृक्षारोपणासाठी महानगरपालिकेमार्फत तुर्भे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, कोपखैरणे निसर्गोद्यान, मीनाताई ठाकरे उद्यान वाशी, नेरुळ पोलीस स्टेशनसमोर, साने गुरुजी उद्यान दिघा अशा विविध जागांवर वृक्षारोपण करण्यात येणार असून कांचन, चिंच, मोहगना पारिजात, सिताफळ, जांभूळ, निंब, आंबा, बांबू अशा पक्ष्यांना आकर्षित करतील व नवी मुंबईच्या जैवविविधतेत भर पडेल अशा देशी वृक्षारोपांची लागवड करण्यात येत आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईकर नागरिकांना सोबत घेत देशी वृक्षरोपांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येत असून या मोहीमेमध्ये वृक्षप्रेमी नागरिकांनी सहभागी होऊन आपले नवी मुंबई शहर हरित व पर्यावरणशील बनविण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन महापलिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## रस्त्यावर भिक्षा मागण्यासाठी हप्ता देण्यास नकार दिल्याने गावगुंडांचा तृतीयपंथीयांवर जीवघेणा हल्ला

● नवी मुंबई प्रतिनिधी : नवी मुंबईतील घणसोली परिसरातील एका रस्त्यावर काही तृतीयपंथीय भिक्षा मागत होते. मात्र येथे भिक्षा मागायची असले तर हप्ता द्या असे स्थानिक गुंडांची मागणी फेटाळताच तीन तृतीयपंथी व्यक्तींना बेदम मारहाण करत हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकल्या असून एका आरोपीचा शोध घेतला जात आहे.




योगेश उर्फ परशुराम नीलकंठ, प्रतीक कांबळे, व त्यांचा अन्य एक साथीदार असे यातील आरोपींची नावे आहेत.ठाणे बेलापूर मार्गावरील घणसोली स्टेशन समोर काही तृतीयपंथी भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. नेहमी प्रमाणे २ तारखेलाही तीन तृतीयपंथी व्यक्ती भिक्षा मागत असताना त्या ठिकाणी आरोपी एका दुचाकीवर आले. आरोपींनी त्या तृतीयपंथी व्यक्तींना आरोपींनी आडवले आणि या ठिकाणी भिक्षा मागायची असेल तर आम्हाला हप्ता द्यावा लागेल अशी दामटती सुरु केली. मात्र त्याला नकार देताच ज्या तृतीयपंथी व्यक्तीने नकार दिला त्याला बेदम मारहाण सुरु केली.

इतर तृतीयपंथी व्यक्तींनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही मारहाण केली गेली. त्यातील एकावर आरोपींनी चाकूचे वार केले. एवढ्यावर आरोपी थांबले नाहीत तर त्यांनी चाकूचा वार करून जखमी होऊन खाली पडलेल्या तृतीयपंथी व्यक्तीचा गळा आवळून ठार करण्याचा प्रयत्न केला मात्र प्रतिकार आणि आरडाओरडा सुरु झाल्याने आरोपी पळून गेले. या घटनेत जबर जखमी झाला आहे.

# महिनाभर मांसाहार न केल्यास शरीरात होतात हे बदल



हैदराबाद : तंदुरी चिकन आणि मटन बघितलं की अनेकांना खाण्याचं मोह आवरत नाही. काहींचा आठवड्यातून दोनदा तरी मांसाहार ठरलेला असतोच. मांसाहार घेणाऱ्या लोकांसाठी चिकन-मटन सोडणं खून कठीण असतं. परंतु तुम्हाला माहिती आहे काय, महिना भर मांस न खाल्ल्यास काय होईल, याचा कधी विचार केला आहे का? चला तर मग जाणून घेऊया...

अभ्यासातून काय आढळले : 'जर्नल ऑफ हायपर टेन्शन २०१६' मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार संशोधकांना असं आढळून आलय की, महिनाभर मांसाहार न केल्यास रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी आणि रक्तदाब कमी होऊ शकतो. कॅनडातील सेंट मायकल हॉस्पीटलचे डॉ. डेव्हिड जेनकिन्स यांच्या निदर्शनात दिसून आलं की, अनेक महिने मांस न खाल्ल्यास रक्तातील कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब कमी होऊ शकतो.

वजन कमी करणे सोपे होईल : प्रत्येकाला माहिती आहे की, मांसाहारामध्ये जास्त कॅलरीज असतात. ते खाल्ल्यानं आपल्या शरीरातील चरबी वाढते. तज्ज्ञांच्या मते जास्त प्रमाणात चिकन आणि मटण खाणं हे लोकांचे वजन वाढण्यामागील मुख्य कारण आहे. महिनाभर मांसाहार न केल्यास वजन कमी होण्याची शक्यता असते. कमी कॅलरी फळे, भाज्या आणि हिरव्या भाज्यांचा आहारात समावेश केल्यास वजन सहज कमी करता येऊ शकते, असा तज्ज्ञांचा दावा आहे.

पचन क्रियेत सुधार : महिनाभर मांसाहार टाळल्यास पचनक्रिया सुधारते. ताज्या हिरव्या भाज्यांमध्ये भरपूर फायबर असतं. त्यामुळं पचनक्रिया सुरळीत चालते. परिणामी बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवणार नाही.

खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करते : मांसाहारी पदार्थांमध्ये चरबी जास्त असते. जास्त प्रमाणात सेवन केल्यानं रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी बिघडू शकते. मात्र, महिनाभर मांस न खाल्ल्यास कोलेस्टेरॉलची पातळी कमी होऊ शकते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. मांसाहार न केल्यानं रक्तदाब सामान्य राहील, असंही म्हटलं जातं.

जळजळ कमी करते : प्रक्रिया केलेलं मांस बाजारमध्ये विविध प्रकारे उपलब्ध आहे. अशा प्रकारे बनवलेल्या वस्तू खाल्ल्यानं शरीरात सूज आणि जळजळ दीर्घकाळ राहते. यामुळं अनेक आजार होऊ शकतात. असा दावा करण्यात आला आहे की, मांस टाळल्यानं जळजळ होण्याचा धोका कमी होऊ शकतो. जेव्हा तुम्ही मांस खाणं बंद करता तेव्हा, तुम्हाला अशक्त आणि थकल्यासारखं वाटतं कारण मांसाहारामध्ये सर्वाधिक प्रथिने आणि लोह असते. याच्या अभामुळं शरीर थकतो.

स्वभावात बदल - जास्त मांसाहार खाल्ल्यास मानुष्य चिडखोर होण्याची शक्यता असते. मांसाहारमुळं माणसाचं शरीर आणि मन दोन्ही अस्वस्थ होण्याची शक्यता असते.

रोगांना आमंत्रण - मांसाहार जास्त प्रमाणत केल्यास अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळं उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, कर्करोग, किडनीचे आजार, संधिवात, अल्सर असे अनेक आजार तुम्हाला होऊ शकतात.

डब्ल्यूएचओचे मत काय - जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार मांसाहार हे मानवी शरीरासाठी धूम्रपानाइतकेच घातक आहे. 'प्रोसेस्ड' मांसापासून प्राणघातक कॅन्सरचा धोका असल्याचंही या अहवालात सांगण्यात आलं आहे.

टीप : वरील आरोग्यविषयक माहिती आणि सूचना केवळ माहितीसाठी आहेत. आम्ही ही माहिती वैज्ञानिक संशोधन, अभ्यास, वैद्यकीय आणि आरोग्य व्यावसायिक यांच्या सल्ल्यांवर आधारित देत आहोत. परंतु, हे अंमलात आणण्यापूर्वी तुम्ही तुमच्या वैयक्तिक डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. या लेखातील मतांशी ईटीव्ही भारत सहमत असेलच असे नाही.

# आयसीसीनं जाहीर केली बक्षिसांची रक्कम

## क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच मिळणार 'इतकी' रक्कम - T20 World Cup 2024




विश्वचषकात पैशांचा वर्षाव : 2024 च्या टी-20 विश्वचषकासाठी आयसीसीनं एकूण 11.25 दशलक्ष डॉलर बक्षीस रक्कम म्हणून देणारं आहे. यावेळी विजेत्या संघाला 2.45 दशलक्ष डॉलर्स दिले जातील. जे भारतीय रुपयाप्रमाणे सुमारे 20 कोटी रुपये आहेत. तर उपविजेत्या संघाला 1.28 दशलक्ष डॉलर्स म्हणजेच भारतीय रुपयाप्रमाणे 10.50 कोटी इतकी आहे. 2022 मध्ये जेतेपद पटकवलेल्या इंग्लंड संघाला 13 कोटी बक्षीसाची रक्कम मिळाली होती. तर 6.44 कोटी रुपये उपविजेत्या पाकिस्तान संघाला देण्यात आले होते.

पराभूत संघांनाही बक्षिसाची रक्कम मिळणार : उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघांनाही यावेळी बक्षिसाची रक्कम दिली जाणार आहे. उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघांना 6.55 कोटी रुपये दिले जातील. तर सुपर-8 मध्ये स्थान मिळवणाऱ्या संघांना 3.18 कोटी रुपये दिले जातील. दुसरीकडे, ग्रुप स्टेजमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघांना 2.06 कोटी रुपये दिले जातील. याशिवाय सर्व संघांना 1.87 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. सुपर-8 पर्यंत प्रत्येक सामना जिंकण्याऱ्या संघाला 25.9 लाख रुपये मिळतील.

भारताचा सामना कधी : या स्पर्धेत टीम इंडिया रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरणार आहे. रोहितचा संघ 5 जूनपासून न्यू यॉर्कमध्ये आयर्लंडविरुद्धच्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. त्यानंतर 9 जूनला संघ पाकिस्तानशी भिडणार आहे. टीम इंडिया या विश्वचषकात विजेतपदासाठी प्रबळ दावेदार मानली जात आहे.

# रोहित शेट्टीबरोबर पंगा घेणं असिम रियाजला पडलं महाग

स्टंटवर आधारित असलेला 'खतरों के खिलाडी'चं १४वं पर्व सुरू होण्यापूर्वीची अधिक चर्चेत आलं आहे. प्रसिद्ध बॉलीवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी हॉस्ट करत असलेल्या या कार्यक्रमाचं सध्या चित्रीकरण सुरू आहे. अजूनपर्यंत टेलिव्हिजनवर ऑनएअर झालेला नाही. पण चित्रीकरणादरम्यान होणाऱ्या गोष्टींचं अपडेट सातत्याने समोर येत आहे. सध्या 'खतरों के खिलाडी'च्या १४व्या पर्वात सहभागी झालेला असिम रियाज हे नाव खूप चर्चेत आलं आहे. कारणही तसंच आहे. होस्ट रोहित शेट्टीबरोबर पंगा घेतल्यामुळे असिमला 'खतरों के खिलाडी'च्या १४व्या पर्वातून बाहेर काढल्याचं समोर आलं आहे. पण का? नेमकं काय घडलं? जाणून घ्या...

'खतरों के खिलाडी'च्या यंदाच्या पर्वात असिम रियाजसह कृष्णा श्रॉफ, सुमोना चक्रवर्ती, शालिन भनोट, अभिषेक कुमार, नियाती फटनानी, करण वीर मेहरा, आशीष मल्होत्रा, शिल्पा शिंदे आणि गश्मीर महाजनी पाहायला मिळणार आहेत. पण असिम रियाजला कार्यक्रमातून बाहेर काढण्यात आलं आहे. कारण असिमचे कार्यक्रमातील इतर स्पर्धकांबरोबर वाद झाले आहेत. हे वाद इतके डोक्याचे झाले की रोहित शेट्टीला असिमला कार्यक्रमाबाहेर काढण्याची वेळ आली. असिम रियाज 'खतरों के खिलाडी'च्या १४ पर्वासाठी खूप उत्साही होता. पण 'बिग बॉस'मधील वृत्ती त्याने 'खतरों के खिलाडी'मध्ये अंगीकारणं खूप महागात पडलं आहे.

# प्रतीक्षा संपली, प्रभास स्टारर 'कल्की 2898 एडी'चा ट्रेलर होणार 'या' दिवशी रिलीज... - Kalki 2898AD Trailer



मुंबई : अभिनेता प्रभास, दीपिका पदुकोण, अमिताभ बच्चन, कमल हासन आणि दिशा पटानी स्टारर 'कल्की 2898 एडी' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या ट्रेलर रिलीजची तारीख जाहीर करण्यात आली आहे. 'कल्की 2898 एडी' चित्रपटाचे चाहते आतुरतेनं वाट पाहत आहेत. आज 5 जून रोजी या चित्रपटाच्या ट्रेलर रिलीजची तारीख जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट या महिन्यात 27 जून रोजी रुपेरी पडद्यावर रिलीज होणार आहे. याआधी प्रभासच्या चाहत्यांना 'कल्की 2898 एडी' या चित्रपटाचा ट्रेलर पाहायला मिळणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर कधी प्रदर्शित होणार यासाठी बातमी वाचा...

ट्रेलर कधी होईल रिलीज? : नाग अश्विनच्या दिग्दर्शनाखाली बनलेला, 'कल्की 2898 एडी' हा एक पौराणिक चित्रपट आहे. या चित्रपटामध्ये महाभारत ते इसवी सन 2898 पर्यंतचा काळ दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटामध्ये अनेक साऊथ कलाकारांनी कॅमिओ केला आहे.'कल्की 2898 एडी' चित्रपटात अनेक सरप्राईज प्रेक्षकांना पाहायला मिळतील. या चित्रपटाच्या ट्रेलरसाठी तुम्हाला जास्त वाट पाहावी लागणार नाही. 'कल्की 2898 एडी'चा ट्रेलर 10 जून रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम पेजवर ट्रेलरची रिलीज तारीख जाहीर केली आहे. 'कल्की 2898 एडी'

चित्रपटाबद्दल : या चित्रपटात प्रभास ॲक्शन करताना दिसणार आहे. अलीकडेच रामोजी फिल्म सिटीमध्ये चित्रपटाबाबत एक मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रभास आणि 'कल्की 2898 एडी'ची संपूर्ण टीम पोहोचली होती. चित्रपटाचे अनेक पोस्टर्स आणि टीझर रिलीज केल्यानंतर, 'कल्की 2898 एडी' चित्रपटाचा ट्रेलर काय करिष्मा करतो हे काही दिवसानंतर कळेल. दरम्यान या चित्रपटाला संगीत संतोष नारायणन यांनी दिलंय. 'कल्की 2898 एडी' चित्रपटामध्ये अमिताभ बच्चन अश्वत्थामाच्या भूमिकेत झळकणार आहे. वैजयंती मूव्हीज आणि सी. आसवानी दत्त अंतर्गत हा चित्रपट निर्मित केला गेला आहे. हा चित्रपट सुमारे 600 कोटीच्या बजेटमध्ये तयार करण्यात आला आहे.

# आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात रोहित शर्मासह कोण सलामी देणार? प्रशिक्षक राहुल द्रविडने दिले उत्तर




भारतीय संघ बुधवारी आयर्लंडविरुद्धच्या सामन्याने टी-२० विश्वचषकात आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. बांगलादेशविरुद्धच्या सराव सामन्यात भारताने यशस्वी जयस्वालच्या जागी रोहित शर्मासोबत सलामीसाठी संजू सॅमसनला मैदानात उतरवले होते. तेव्हापासून या स्पर्धेत भारत आपल्या टॉप ऑर्डरमध्ये बदल करणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनीही याबाबत मौन सोडले, परंतु त्यांनी आपले पत्ते उघड करण्यास स्पष्टपणे नकार दिला.

संजू सॅमसनने बांगलादेशविरुद्ध दिली होती सलामी – बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान रोहित शर्मासोबत संजू सॅमसन सलामीवीर म्हणून आला होता. सहसा यशस्वी जैस्वाल सलामीवीर म्हणून खेळतो, पण सराव सामन्यादरम्यान यशस्वीला संधी मिळाली नाही. संजू सॅमसनला संधी मिळाली, पण त्याला या संधीचा फायदा घेता आला नाही आणि तो सहा चेंडूंत एक धाव काढून बाद झाला. विराट कोहलीही बांगलादेशविरुद्ध खेळला नव्हता.

'टीम इंडियाकडे अनेक पर्याय' – टीम इंडियाकडे अनेक पर्याय आहेत आणि संघ व्यवस्थापन परिस्थितीचा विचार करूनच संयोजनाबाबत निर्णय घेईल, असे द्रविड यांनी सांगितले. राहुल द्रविड म्हणाले, "आमच्याकडे पर्याय आहेत. त्यामुळे आम्ही सध्या आमचे पत्ते उघडत करत नाही. आमच्याकडे रोहित, यशस्वी आणि कोहली देखील उपलब्ध आहेत ज्यांनी आयपीएलमध्ये ओपनिंग म्हणून सुरुवात केली आहे. आम्ही तिन्ही पर्याय पाहूनच संघ निवडू आणि परिस्थिती पाहूनच निर्णय घेऊ."

यशस्वी जैस्वालसाठी काय भूमिका असणार?

रोहित शर्मा आणि विराट कोहली ओपनिंग म्हणून उतरले तर यशस्वी जैस्वालची भूमिका काय असणार? त्याला तिसऱ्या क्रमांकावर संधी दिली जाणार की तो प्लेइंग इलेव्हनचा भाग असणार नाही? हा असा प्रश्न आहे, ज्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आयपीएल २०२४ मध्ये यशस्वीची कामगिरी खूपच निराशाजनक होती, तर दुसरीकडे कार अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर परतलेल्या पंतने आयपीएलमधील कामगिरीने प्रभावित केले.

टी-२० विश्वचषक २०२४ साठी भारतीय संघ:

रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), शिवम दुबे, हार्दिक पंड्या (उपकर्णधार), रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, युजवराज, चहल पटेल. संजू सॅमसन (यष्टीरक्षक), मोहम्मद सिराज.

राखीव खेळाडू : शुबमन गिल, रिंकू सिंग, खलील अहमद, आवेश खान

## दिनविशेष

### घटना

२०१७ : सीरियन नागरी युद्ध रक्काची लढाई: इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड द लेव्हंट (ISIL) आणि सीरियन डेमोक्रॅटिक फोर्सेस (SDF) यांच्यात लढाई सुरु.

२००४: भारताच्या राष्ट्रपतींनी तमिळ शास्त्रीय भाषा म्हणून घोषित केली.

२००२: पूर्व भूमध्यसागरीय घटना. ग्रीस आणि लिबिया दरम्यान भूमध्य समुद्रावर दहा मीटर व्यासाचा अंदाजे पृथ्वीच्या जवळचा लघुग्रह फुटला. नागासाकी अणुबॉम्बपेक्षा किंचित

१९९३ : मंगोलिया देशात सर्वप्रथम राष्ट्राध्यक्षीय निवडणुका.

१९८२: लेबनॉन युद्ध - इस्रायल आणि लेबनॉन देशात युद्ध सुरू झाले..

१९७४ : स्वीडन देशाने संसदीय राजेशाही स्वीकारली.

### जन्म

१९९१: सुशिल अत्तरदे -

१९७०: सुनील जोशी भारतीय क्रिकेटपटू

१९५६: बियॉन बोर्ग - स्वीडिश लॉनटेनिस खेळाडू

१९५६ : ब्योर्न बोर्ग - सलग पाच वेळा ९ विम्बल्डन जिंकणारे पहिले व्यक्ती

१९५५ : सुरेश भारद्वाज भारतीय रंगमंच, दिग्दर्शक आणि रंगमंच शिक्षक

१९४३ : आसिफ इक्बाल भारतीय- पाकिस्तानी क्रिकेटर

१९४०: बैरन भट्टाचार्य - भारतीय- इंग्लिश अभियंता आणि शैक्षणिककुमार भट्टाचार्य

### निधन

२००२: शांता शेळके- भारतीय कवयित्री आणि गीतलेखिका (जन्म: १२ ऑक्टोबर १९२२)

१९८६ : मस्ती व्यंकटेश अय्यंगार कन्नड कवी, कथाकार आणि कादंबरीकार ज्ञानपीठ पुरस्कार (जन्म: ६ जून १८९१ )

१९७६: जे. पॉल गेटी - अमेरिकन उद्योगपती (जन्म: १५ डिसेंबर १८९२)

१९६१: कार्ल युंग - मानसशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ञ (जन्म: २६ जुलै १८७५)

१९५७: गुरूदेव रानडे - आधुनिक विद्याविभूषित तत्त्वज्ञ व संत (जन्म: ३ जुलै १८८६)

१९४१: लुई शेवरोलेट - शेवरले कंपनीचे सहसंस्थापक (जन्म: २५ डिसेंबर १८७८)

१८९१ : जॉन ए. मॅकडोनाल्ड - कॅनडाचे पहिले पंतप्रधान (जन्म: ११ जानेवारी १८१५ )

१८६१: कॅमिलो बेन्सो - इटलीचे पहिले पंतप्रधान (जन्म: १० ऑगस्ट १८१०)

## राशि भविष्य

**मेष** — आरोग्य चांगले राहील. आजच्या दिवशी धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून देवाण-घेनानीने जोडलेल्या गोष्टींमध्ये जितके तुम्ही सतर्क राहाल तितकेच तुमच्यासाठी चांगले असेल. दूरवर राहणा-या नातेवाईकांकडून अनपेक्षितपणे गोड बातमी मिळाल्याने संपूर्ण कुटुंबासाठी आनंदाचा दिवस ठरेल.

**वृषभ** — आपले मत मांडण्यास कचरु नका. तुमचा आत्मविश्वास ढळू देऊ नका, अन्यथा त्यामुळे आपल्या प्रगतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतील. स्वत:ला व्यक्त होऊ द्या आणि हसतमुखाने अडचणींचा सामना करा. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा - आणि फक्त महत्त्वाच्या आवश्यक गोष्टींचीच आज खरेदी करा.

**मिथुन** — आपला संयम ढळू देऊ नका, विशेषत: कठीण समयी नियंत्रण ठेवा. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. तुम्हाला आज काही समस्या उद्भवतील - पण वास्तववादी राहा आणि मदत करणाऱ्या लोकांकडून चमत्कार घडेल अशी अपेक्षा बाळगू नका.

**कर्क** — स्वत:ला चुस्त तंदुरुस्त ठेवण्यासाठी उच्च कॅलरी आहार टाळा. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. कुटुंबातील लोकांमध्ये पैश्याला घेऊन आज वाद होऊ शकतात. पैश्याच्या बाबतीत तुम्हाला कुटुंबातील सर्व लोकांसोबत स्पष्ट होण्याचा सल्ला दिला जातो.

**सिंह** — तुमच्याकडे प्रचंड प्रमाणात ऊर्जा आहे - परंतु कामाच्या ताणामुळे तुम्ही त्रासून जाल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील. संपूर्ण कुटुंबासाठी समृद्धीचे ठरतील असे प्रकल्प तुम्ही हात घ्यायला हवेत.

**कन्या** — काही ठिकाणी तुम्हाला जबरदस्त माघार घ्यावी लागू शकेल. पण त्यामुळे तुम्ही कोसळून न जाता, अपेक्षित ध्येयासाठी कठोर परिश्रम घ्या. ही माघार तुम्ही खुणेच्या दगडाप्रमाणे लक्षात ठेवा. या कठीण प्रसंगी नातेवाईक देखील तुम्हास मदत करतील.

**तूळ** — क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. तुमचे आई-वडिल तुमचा व्यर्थ खर्च पाहून आज चिंतीत होऊ शकतात आणि म्हणून तुम्हाला त्यांच्या रागाचे शिकार ही व्हावे लागू शकते. मित्रपरिवार आणि नातेवाईकांबरोबर मजा करा. आज दिवसभर तुमचे प्रेम बहरत जाणार आहे.

**वृश्चिक** — तुमच्या आरोग्याच्या सुधारणेसाठी पुन्हा पहिल्यापासून प्रयत्न सुरु करण्यासाठी चांगला दिवस आहे. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. तुमचे जोडीदार/भागीदार तुम्हाला पाठिंबा देतील आणि मदतही करतील. आजच्या दिवशी काळजी करू नका, आपले दु:ख बर्फाप्रमाणे वितळून जाईल.

**धनु** — संताकडून मिळणारे दैवी ज्ञान समाधान आणि आराम मिळवू देईल. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील. आपल्या करिअरवर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी इतर आउटडोअर उपक्रमांकडे असणा-या मुलांच्या ओढ्यामुळे तुम्हाला निराशा येऊ शकते.

**मकर** — थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा - त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल - दररोज अशा प्रकारे दिवसाची सुरूवात करा. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

**कुंभ** — एखादे झाड जसे स्वत: उन्हातान्हात असूनदेखील दुस-यांना शीतल छाया देते, तसे आपले आयुष्य आहे.त्यामुळेच आपल्या एखाद्या मित्राने केलेली विशेष प्रशंसा ही तुमच्यासाठी आनंदाचा स्रोत असेल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**मीन** — मानसिक ताणतणावर मात करण्यासाठी अध्यात्मिक, धार्मिक उपाययोजनांची सध्या तातडीची गरज आहे. ध्यानधारणा आणि योगसाधना तुम्हाला मानसिकदृष्ट्या कणखर बनवेल. दिवसभर जरी तुम्ही धन कमावण्यासाठी प्रयत्न करत असाल परंतु, संध्याकाळी तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.

## गोव्यात समुद्राच्या लाटात बसून दारु पिण्याचा मोह युवकाला नडला, पाण्यात बुडून मृत्यू




● **पणजी** : समुद्राच्या उसळत्या लाटात बसून दारु पिण्याचे साहस गोव्यात एका युवकाच्या जीवावर बेतले. लाटाच्या प्रवाहात तो बुडाला व मरण पावला. निरज नारायण पवार (२५) असे त्याचे नाव असून, सासष्टीतील वार्का किनाऱ्यावर वरील दुदैवी घटना रविवारी २ रात्रीच्या दरम्यान घटना घडली. मृतदेह नंतर सापडला.मयत मिनेझिसभाट सां जुझे दि अरियाल येथील रहिवाशी आहे. त्याला दारु पिण्याचे व्यसन जडले होते.

वार्का किनाऱ्यावर तो गेला होता. तेथे त्याने दारु प्यायली होती. दारुच्या नशेतच तो पाण्यात उतरला व तेथेही दारु प्यायला लागला. एवढयात जोरदार लाट आली. व त्याचा तोल ढळला. त्यामुळे तो पाण्यात पडला व बुडाला.

किनाऱ्यावर पोलिसांना मृतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपासकामाला सुरुवात केली. त्याच्या मित्राकडे चौकशी केली असता, मृत्युमागील कारण उघड झाले. मृतदेह नंतर येथील दक्षिण गोवा जिल्हा इस्पितळान नेउन शवचिकित्सेनंतर मयताच्या कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला. उपनिरीक्षक वैभव शिरोडकर पुढील तपास करीत आहेत.

# खराब हवामानामुळे ट्रेकिंगसाठी गेलेल्या 8 ट्रेकर्सचा मृत्यू ; 8 जणांच्या सुटकेकरिता बचावकार्य सुरू




● उत्तराखंड : सहस्त्रतालच्या ट्रेकसाठी गेलेल्या बावीस सदस्यीय ट्रेकिंग ग्रुपमधील 8 जणांचा खराब हवामानामुळं मृत्यू झाल्याची माहिती समोर आलीय. उर्वरित 14 ट्रेकिंग मेंबर्स अडकल्याची माहिती समोर आली होती. या घटनेची माहिती प्रशासनाला मिळताच त्यांनी बुधवारी सकाळी एक पथक रवाना करून अडकलेल्या ट्रेकर्सला वाचवलं. हवाई दलाकडुन

बचाव कार्य सुरू : अडकलेल्या ट्रेकर्स आणि मृतदेहांची सुटका करण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी हवाई दलाच्या माध्यमातून हेली रेस्क्यू ऑपरेशन राबविण्याची विनंती केली होती. बेपत्ता ट्रेकर्सच्या शोधासाठी हवाई दलानं आजपासून बचावकार्य सुरू केलं. जिल्हा प्रशासनाच्या विनंतीवरून हवाई दलाची दोन चेतक हेलिकॉप्टर तैनात करण्यात आली आहेत. यासोबतच जिल्हाधिकाऱ्यांनी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन सचिव रणजित सिन्हा यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या घटनेची माहिती दिलीय.

आठ जणांचा मृत्यू : समोर आलेल्या माहितीनुसार, कर्नाटकातील 18 सदस्य आणि महाराष्ट्रातील 1 आणि 3 स्थानिक ट्रेकर्सचा समावेश आहे. हे सर्व सहस्त्रताल या ठिकाणी ट्रेकसाठी निघाले होते. सर्व ट्रेकर्स 7 जूनपर्यंत परत येणार होते. ट्रेकिंग दरम्यान अचानक खराब हवामानामुळं, दाट धुकं आणि बर्फवृष्टीमध्ये टीम अडकली. तेथे योग्य व्यवस्था नसल्यानं ट्रॅकर्सना संपूर्ण रात्र थंडीत काढावी लागली. थंडीमुळे 8 ट्रेकर्सचा मृत्यू झाला. टीमला ट्रॅकवर घेऊन जाणाऱ्या ट्रॅकिंग एजन्सीच्या मालकानं त्याच्या संस्थेच्या अधिकाऱ्याला ट्रॅकर्सच्या मृत्यूची माहिती दिलीय.

ट्रेकर एजन्सीचे लोक काय म्हणाले : ट्रेकर एजन्सीचे भागवत सेमवाल यांनी सांगितलं की, "सुमारे 14,000 फूट उंचीवर असलेल्या सहस्त्रतालला जाण्यासाठी भटवाडी ब्लॉकमधील सोरा गावातून 45 किमीचे अंतर पायी जावे लागते. यासोबतच या दिवसांत या ट्रेकसाठी हवामान अनुकूल आहे. पण जेव्हा आपण उंचीवर पोहोचतो तेव्हा जोरदार वाऱ्यासोबत धुकं पसरतं. त्यामुळं ट्रेकर्स रस्ता चुकतात. या कारणामुळं या ट्रेकर टीममधील सदस्यांचीही वाट चुकली असावी."

6 ट्रेकर्सची सुटका : सहस्त्रतालमध्ये अडकलेल्या 6 ट्रेकर्सची सुटका करण्यात आलीय. यामध्ये सौम्या पत्नी विवेक (वय 37), विनय मुलगा कृष्णमूर्ती (वय 47), शिव ज्योती, सुधाकर बीएस नायडू (वय 64), गुरुराज यांची पत्नी सुमृती (वय 40), सीना (वय 48) यांचा समावेश आहे. सर्व लोक कर्नाटकचे रहिवासी आहेत.

बचाव कार्य सुरू : उत्तरकाशी जिल्ह्याचे डीएम डॉ. मेहरबान सिंह बिश्त यांनी सांगितलं की, "सहस्त्रतालच्या ट्रेकिंग मार्गावर अडकलेल्या ट्रेकर्सना वाचवण्यासाठी एसडीआरएफ आणि वन विभागाचे बचाव पथक वेगवेगळ्या दिशांनी घटनास्थळी पोहोचले आहे. वनविभागाच्या दहा सदस्यांचे रेस्क्यू आणि बचाव पथक सिल्ला गावाच्या पलीकडे गेले आहे. उत्तरकाशी येथील जिल्हा मुख्यालयातील एसडीएफ टीम बुधवार (5 जून) रोजी पहाटे टिहरी जिल्ह्यातील बुधाकेदार येथे बचाव कार्य सुरू करण्यासाठी रवाना झालीय."

## लोकसभा निवडणुकीत नाव घेतले नाही, विधानसभेला नाव घेऊन सांगणार याला पाडा - मनोज जरांगे पाटील



● जालना - "यंदाच्या लोकसभा निवडणुकीत आम्ही कोणाचाही प्रचार केला नाही किंवा कोणाला पाडाही म्हटलो नाही. परंतु विधानसभा निवडणुकीत आम्ही ठाम राहणार आहोत. कोणाला पाडायचं तेही थेट सांगणार आहोत. मराठ्यांची खरी किंमत या निवडणुकीच्या निमित्तानं दिसून आली. मराठा आरक्षण मिळावं यासाठी आम्ही संघर्षाला तयार आहोत," असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मंगळवारी जून रोजी देशासह राज्यातील लोकसभा निवडणुकीचा निकाल हाती आला. यामध्ये बऱ्याच दिग्गज नेत्यांना सत्तेवरून काढता पाया घ्यावा लागला आहे. या संदर्भात बोलताना मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "आम्ही जाहीररित्या कोणालाही पाडा म्हटलेलंच नाही. आम्ही तसं म्हटलो असतो तर माझी किंवा समाजाची प्रतिष्ठा पणाला लागली असती. परंतु विधानसभेच्या निवडणुकीत आम्ही कोणाला पाडायचं हे सांगण्यासाठी भूमिका घेणार आहेत", असं जरांगे पाटील म्हणाले.

मराठ्यांच्या शक्तीचं मतात परिवर्तन- "माझ्या समाजाच्या खांद्यावरती जबाबदारी आहे. गोरगरीब मराठ्यांना किंमत दिली जात नव्हती. विश्वासात घेतलं जात नव्हतं. मात्र, माझ्या गरीब मराठ्यांना या निवडणुकीत किंमत आली. मराठ्यांच्या एकजुटीची ताकद यावेळी दिसली. आम्हीदेखील ताकद दाखवू शकतो, हे सिद्ध केलं. मराठ्यांच्या शक्तीचं मतात परिवर्तन होत नाही, असं म्हटलं जात होतं. पण ते झालं, असंही जरांगे पाटील म्हणाले.

विश्वासात न घेणाऱ्यांना पाडा- मनोज जरांगे पुढं म्हणाले की, "निवडून कोणीही येऊ द्या. आम्हाला त्याची काही देणंघेणे नाही. पण या सत्ताधाऱ्यांना या मराठ्यांनी खाली खेचलं आहे, हे मात्र निश्चित. महाविकास आघाडी निवडून येऊ द्या की, महायुती आघाडी निवडून येऊ द्या. आम्ही राजकारण करणार नाही. करतही नाही. हा फक्त मी एवढं म्हटलं होतं की आपल्याला विश्वासात न घेणाऱ्यांना पाडा. पण कोणाला पाडा आणि कुठे पाडा हे मात्र म्हटले नव्हतं. कारण आम्हा गोरगरीब मराठ्यांचं भवितव्य या राजकारण्यांनी सर्व धुळीत मिळवलं आहे. त्यामुळे मराठ्यांनी हे मतदानाच्या माध्यमातून दाखवून दिलं आहे."

अंतरवाली सराटी येथे उपोषण करणार- "माझा मराठा आरक्षणाचा मुद्दा हा लोकसभेचा नसून राज्याचा आहे. त्यामुळे मी लोकसभा मुद्द्यावर बोलणार नसून आता येत्या काही दिवसात मी आरक्षण मिळवून दाखवणारच", असा ठाम विश्वास जरांगेनीं बोलून दाखवला. येत्या 8 जून रोजी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसणारच आहे, असा ठाम निर्णय त्यांनी सांगितला. काही दिवसापूर्वी काही गावकऱ्यांनी जालना जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन आंतरवाली सराटी येथे मनोज जणांची पाटील यांनी उपोषण करू नये, अशी मागणी केली होती.

## मैत्रिणीसोबतचा वाद मिटवण्याच्या बहाण्याने विवाहितेवर बलात्कार, हडपसर परिसरातील घटना



● पुणे : मैत्रिणीसोबत असलेला वाद मिटवण्याच्या बहाण्याने बोलावून घेऊन विवाहितेवर जबरदस्तीने बलात्कार केल्याची घटना घडली, तसेच विवाहितेला धमकी देऊन तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. हा प्रकार ऑगस्ट २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत हडपसर परिसरात घडला आहे. याप्रकरणी धाराशिव येथे राहणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत २७ वर्षीय विवाहित महिलेने सोमवारी (दि.३) हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून ब्रह्मदेव विठ्ठल मांजरे (२६, रा. परांडा, जि. धाराशिव) याच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि फिर्यादी एकमेकांच्या ओळखीचे आहेत. फिर्यादी यांचा त्यांच्या मैत्रिणीसोबत वाद झाला होता. आरोपीने मैत्रिणीसोबत झालेले वाद मिटवण्यासाठी फिर्यादी यांना हडपसर येथे बोलावून घेतले.

फिर्यादी हडपसर येथे आल्यानंतर आरोपीने जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवला, तसेच आरोपीने त्याच्या खोलीवर नेऊन महिलेसोबत संबंध ठेवून त्याच्या मोबाइलमध्ये व्हिडीओ व फोटो काढले. ते फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन वारंवार शारीरिक संबंध ठेवला, तसेच पतीची नोकरी घालवण्याची धमकी देऊन पतीवर खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मुलाणी करत आहेत.

## 2 held for capturing, displaying protected animals at Dadar zoo



● Three days after seven protected and exotic animals were seized from Dadar's Marine Aqua Zoo, forest department officials on Monday arrested two accused, including the owner as well as the manager at the Dadar facility for possessing, trading and illegally displaying animals protected under the Wildlife Protection Act (1972). Assistant Conservator of Forest (ACF) Sonal Valvi told The Indian Express, "Following our investigation, we have booked an offence against the two accused — Aman Abdul Sattar Khan, the manager and Yuvraj Nandkumar Moghe, the owner — for illegal possesion, display and trade displaying the animals which are protected under the Wildlife Protection Act's (1972) schedule I and IV. We have arrested the two accused who will be produced in the court tomorrow (Tuesday)."

## Delhi High Court tells Centre to decide in 6 weeks AAP's plea seeking accommodation for party office




● The Delhi High Court on Wednesday asked the Centre to decide in six weeks the Aam Aadmi Party's representation for allotment of accommodation for its party office in the national capital.

In March, the Supreme Court asked the AAP to vacate its office in Rouse Avenue by June 15 as the land in question had been allotted for the expansion of judicial infrastructure.

A single-judge bench of Justice Subramonium Prasad said that while the AAP is not entitled to plots 23-24 on DDU Marg, which are occupied by one of its ministers, it is entitled to a house from the "general pool" till permanent land is allotted for the construction of its office. The high court further said while orally pronouncing the verdict, "Mere pressure of non-availability (of accommodation) is no reason to reject. Because pressure is always there and houses have always been allotted to political parties. Their representation will be considered in six weeks time, by a reasoned order. If (representation is) rejected they can always take steps..."

The court, however, clarified that there is no interim arrangement in the meantime. "There is no interim arrangement, because the party is not entitled to 23-24 (DDU Marg), I have written. But in six weeks' time, decide their representation," it added.

## Reduced vote share in Pune rings alarm bell for BJP in Pune Cantonment, Shivajinagar Assembly segments



● The BJP has retained the Pune Lok Sabha seat but its declining strength in the city has rang an alarm bell in Pune Cantonment and Shivajinagar segments for the forthcoming Assembly election in Maharashtra.

BJP candidate Murlidhar Mohol defeated Congress candidate Ravindra Dhangekar by 1,23,038 votes in the Lok Sabha election results announced on Tuesday. However, the BJP votes decreased by 48,107 compared to that in 2019, while the Congress bagged 1,53,483 more votes than in the previous Lok Sabha election.

The fall in number of votes comes in addition to the support from alliance partner Shiv Sena-led by Eknath Shinde, NCP-led by Ajit Pawar, MNS-led by Raj Thackeray and RPI(A) led by Ramdas Athawale.

## अचानक पडलेल्या पावसामुळं मुंबईकरांची तारांबळ,



● मुंबई : लोकसभा निकडणुकीची मतमोजणी मंगळवारी पार पडली. मुंबईकर उकडूयानं पहिलेच हैराण झाले असतांना लोकसभा मतमोजणीमुळे मुंबईत राजकीय वातावरण देखील तापलं होतं. मुंबईसह उपनगरात अनेक भागात पावसानं हजेरी लावली आहे. हलक्या सरी तर चांगला पाऊस बरसल्याचं चित्र पाहायला मिळालं आहे. उकाड्यामुळे हैराण झालेल्या मुंबईकरांची सकाळ काहीशी दिलासादायक झाली आहे. आज सकाळी मुंबईत पावसानं हजेरी लावली. काही भागात हलक्या सरी तर काही भागात जोरदार पाऊस पडला. दादर परिसरात देखील पावसानं हजेरी लावली. पश्चिम उपनगरातील कांदिवली, अंधेरी आणि वांद्रे परिसरात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. घाटकोपर, वडाळा यांसह मुंबईतील काही भागात तुरळक पाऊस पडल्याची नोंद आहे. अचानक पडलेल्या पावसामुळं मुंबईकरांची तारांबळ उडाली. अचानक आलेल्या पावसामुळे मुंबईकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली. पूर्व मोसमी पावसासाठी पोषक हवामान तयार होतंय. ढगाळ वातावरण निर्माण झाल्यानं कमाल तापमानामध्ये देखील घट होत असल्याचे चित्र आहे. मुंबईत अनेक ठिकाणी पावसानं हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच उडालेली दिसून येतेय. हा पाऊस पूर्व मान्सूनचा असल्याचा दावा हवामान खात्याचा केला आहे.

येत्या पाच दिवसात पावसाचा अंदाज हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या पाच दिवसात कोकणात रायगड , रत्नागिरी , सिंधुदुर्ग जिल्ह्यात वीजांचा कडकडाट सह वादळी वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवली आहे. ठाणे जिल्ह्यात 5 ते 8 जून तर मुंबई शहर आणि उपनगरात 6 ते 8 जूनला वीजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील अहमदनगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यात सात जून रोजी वीजांचा कडकडाट आणि वादळीवाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर वाऱ्याचा वेग ताशी 50 ते 60 किलोमीटर राहण्याचा अंदाज देखील हवमान खात्यानं वर्तवंला आहे.

## काही धर्मगुरूंच्या हस्तक्षेपामुळे दक्षिण गोव्यात पराभव: मुख्यमंत्री



● पणजी: काही धर्मगुरुंच्या हस्तक्षेपामुळे दक्षिण गोव्यात भाजपला पराभव पत्करावा लागल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी म्हटले आहे. जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य असून, तो आम्ही स्वीकारल्याचे सावंत यांनी नमूद केले.

पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, दक्षिण गोव्यातील काही मतदारसंघांत आम्हाला अपेक्षित आघाडी मिळाली. पल्लवी धेपे यांचा पराभव झाला असला तरी भाजपची मते वाढून ४५.२६ टक्क्यांवर पोचली आहेत. पराभवाबद्दल कोणालाही दोष देता येणार नाही. काही गोष्टींवर आम्ही निश्चितपणे विचारमंथन करणार आहोत.

मुख्यमंत्री म्हणाले की, उत्तर गोवा मतदारसंघात श्रीपाद नाईक यांनी विक्रमी मताधिक्य मिळवले आहे. भाजपला या मतदारसंघात ५६ टक्के मते मिळाली आहेत. केंद्रातही भाजपची सत्ता येणार असल्याने पुन्हा डबल इंजिन सरकार प्राप्त होणार आहे. त्यामुळे विकासकामे गतीने होतील. दक्षिणेतील पराभवामुळे आम्ही स्वस्थ बसणार नाही. २०२७च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसशीच आमची लढत होईल.

तीन ठिकाणी आघाडी

उत्तर गोव्यात भाजपने काँग्रेसवर १.१३ लाख मतांहून अधिक मताधिक्याने मिळविलेल्या यशात साखळी, डिचोली, मये, वाळपई आणि पर्ये मतदारसंघाचा सिंहाचा वाटा आहे. तर काँग्रेसला कळंगुट, हळदोणे आणि सांताक्रूझ मतदारसंघात आघाडी मिळाली आहे. हळदोणे, सांताक्रूझ आणि कळंगूट या तीन विधानसभा मतदारसंघापैकी केवळ हळदोणा मतदारसंघातच काँग्रेसचा आमदार आहे. तर इतर दोन्ही मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत.

# चालकाला डुलकी लागली अन 'समृद्धी'वर बस उलटली



● बुलढाणा, प्रतिनिधी :

समृद्धी महामार्गावर छत्तीसगड राज्यातील खासगी बस भरवेगात उलटली. सुदैवाने यात प्राणहानी झाली नसून प्रवासी जखमी झाले आहे. आज ५ जूनला डोणगाव (तालुका मेहकर) नजीक ही दुर्घटना घडली.

छत्तीसगड येथून पुण्याकडे जाणारी (सीजी.०९ जे. आर. ७००२ क्रमांकाची) खाजगी बस आज डोणगाव जवळ पोहोचली. दरम्यान, चालकाला डुलकी लागल्याने बस उलटली. बसमध्ये जवळपास ५६ प्रवासी असल्याची माहिती आहे. या अपघातामध्ये दोन प्रवासी जखमी झाले आहे. देवसिंग धुर्वे व राजबब्बर, (रा.कबीरधाम) अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळतात महामार्ग पोलिसांनी घटनास्थळ गाठले. परिसरातील रुग्णवाहिकेतून जखमींना मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. इतर किरकोळ जखमी प्रवाशांवर उपचार करण्यात आले असून त्यांच्या पुढील प्रवासा मार्ग कायम चर्चेत राहतो. होणाऱ्या अपघातात चालकाला पहाटे, सकाळी वा उत्तररात्री डुलकी लागल्याने होणाऱ्या अपघातांचे प्रमाण लक्षणीय आहे. चालकांना पुरेशी विश्रांती मिळत नाही किंवा झोप न झाल्याने हे अपघात होतात. याशिवाय महामार्ग संमोहनमुळे होणाऱ्या अपघातांची संख्या देखील लक्षणीय आहे.

# हिवताप, डेंग्यू मुक्त मुंबईसाठी कृती आराखडा तयार करणार

## अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांचे निर्देश

● मुंबई, प्रतिनिधी :

मुंबई डेंग्यू व हिवतापमुक्त करण्यासाठी सूक्ष्म उपाययोजना करण्यावर भर देण्याबरोबर कृती आराखडा तया करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. त्याचबरोबर जनजागृतीवर अधिक भर द्यायला हवा, असे मत अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी व्यक्त केले. पावसाळ्याची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रात जून हा 'हिवताप विरोधी महिना' म्हणून पाळण्यात येतो. राज्य सरकार, मुंबई महानगरपालिका आणि जागतिक आरोग्य संघटना यांनी एकत्रितरित्या मुंबईमध्ये दोन दिवसीय विशेष कार्यशा[[ळा आणि




परिसंवादाचे आयोजन केले होते. यावेळी झालेल्या चर्चासत्रात डॉ. सुधाकर शिंदे बोलत होते.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या सामुदायिक औषधशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक, सर्व २४ विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांबरोबर समन्वय साधून हिवताप निर्मूलनाच्या पार्श्वभूमीवर सगळ्यांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे, असे डॉ. सुधाकर शिंदे यांनी सूचित केले. राज्य सरकारच्या हिवताप आणि कीटकजन्य आजार विभागाच्या तांत्रिक अधिकारी डॉ. रुप कुमारी यांनी रुग्णांवरील उपचाराबद्दलच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. तसेच हिवताप नियंत्रणासाठी १ – ३ – ७ धोरणचा अवलंब करण्यासाठी मार्गदर्शन केले. जागतिक आरोग्य संघटनेचे पथकप्रमुख डॉ. बद्री थापा यांनी हिवताप उद्रेकांचा तपास कसा करता येईल यावर लक्ष केंद्रीत करण्याच आवाहन केले. डॉ. एन. आर. तुली यांनी दिल्लीत विविध उपाययोजना कशा प्रकारे राबविल्या जातात, तसेच समुदाय जागरुकता कशी केली जाते यावर लक्ष केंद्रीत केले. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी सर्वांना सूक्ष्म योजना आखून काम करण्याचे आवाहन केले. हिवताप, डेंग्यू नियंत्रणात आणणे, त्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, कीटकनियंत्रण प्रभावीपणे राबविणे इत्यादी विषयांवर या परिसंवादात चर्चा झाली. यावेळी मुबई महानगरपालिकेच्या सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या सामुदायिक औषधशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक, सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व ७ परिमंडळातील उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी, मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी, कीटकनाशक अधिकारी आदींचा सहभाग

# तुरुंगातून निवडणूक लढवली अन् जिंकलीही; अमृतपाल सिंग आणि अब्दुल राशिद शेख खासदारकीची शपथ कशी घेणार?

● काश्मीर, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळालं आहे. तर इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या आहेत. जम्मू काश्मीरमध्ये कलम ३७० रद्द केल्यानंतर पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत जम्मू काश्मीरच्या दोन माजी मुख्यमंत्र्यांना पराभवाला समोरं जावं लागलं. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल





कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांचा आणि माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांचा पराभव झाला.

माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बारामुल्ला लोकसभा मतदारसंघामधून ही निवडणूक लढवली होती. त्यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार अब्दुल राशिद शेख (राशिद इंजिनिअर) हे निवडणुकीच्या मैदानात होते. अब्दुल राशिद शेख हे सध्या तुरुंगात आहेत. त्यांच्यावर यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी ते तुरुंगात आहेत. मात्र, त्यांनी तुरुंगात असतानाही बारामुल्ला लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत जनतेने अब्दुल राशिद शेख यांना निवडूनही दिलं. त्यामुळे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांना पराभवाला समोरं जावं लागलं. तर दुसरीकडे पंजाबमधील खडूर साहिब लोकसभा मतदारसंघातून अमृतपाल सिंगने तुरुंगातूनच निवडणूक लढवली आणि जिंकली.

# जम्मू-काश्मीरमध्ये दोन माजी मुख्यमंत्र्यांचा पराभव, तर भाजपाला मिळाल्या 'एवढ्या' जागा

● जम्मू-काश्मीर, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळालं आहे. तर इंडिया आघाडीला २३२ जागा मिळल्या आहेत. भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान ४०० पारचा नारा दिला होता. मात्र, ४०० पारचं भाजपाचं स्वप्न भंगलं आहे. जम्मू काश्मीरमध्ये कलम ३७० रद्द केल्यानंतर पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत दोन माजी मुख्यमंत्र्यांचा पराभव झाला आहे. जम्मू आणि काश्मीरचे





माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांचा या निवडणुकीत पराभव झाला. तसेच माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांचाही पराभव झाला. माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बारामुल्ला लोकसभा मतदारसंघामधून ही निवडणूक लढवली होती. त्यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार अब्दुल राशिद शेख यांनी निवडणूक लढवली आणि ओमर अब्दुल्ला यांचा तब्बल दोन लाख मतांनी पराभव केला. या निवडणुकीच्या निकालाआधी एक्झिट पोलने ओमर अब्दुल्ला हे विजयी होतील असा अंदाज वर्तवला होता. मात्र, त्यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला. विशेष म्हणजे अब्दुल राशिद शेख हे तुरुंगात आहेत. त्यांच्यावर यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल आहे. त्या प्रकरणी ते शिक्षा भोगत आहेत. पण त्यांनी ही निवडणूक तुरुंगातून लढवली आणि थेट माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा पराभव केला. दुसरीकडे जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी लोकसभा मतदारसंघामध्ये पीडीपीच्या अध्यक्षा आणि माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांचाही मोठ्या मताधिक्यांनी पराभव झाला.

# गुजरातमध्ये दहा वर्षांनंतर काँग्रेसचे खाते



● गुजरात, प्रतिनिधी :

दहा वर्षानंतर काँग्रेसला गुजरातमध्ये खाते खोलण्यात यश आले आहे. भाजपने २६ जागांपैकी २५ जागा जिंकल्या आहेत. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि परशोत्तम रुपाला आणि गुजरात भाजपचे अध्यक्ष सीआर पाटील हे विजयी झाले आहेत. अमित शहा यांनी गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून ७.४४ लाख अशा विक्रमी मतांनी विजय मिळवला आहे, तर बनासकांठा (२) येथून काँग्रेसचे गनीबेन नागजी ठाकोर हे एकमेव उमेदवार विजयी झाले. दरम्यान, सुरतची जागा भाजपने यापूर्वीच बिनविरोध जिंकली आहे.

भाजपने अहमदाबाद पूर्व, अहमदाबाद पश्चिम, बारडोली, भरूच, भावनगर, छोटा उदयपूर, गांधीनगर, जामनगर, जुनागढ, खेडा, महेसाणा, नवसारी, राजकोट आणि साबरकांठा जिंकले आहेत. भरुच मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार मनसुख वसावा यांनी आम आदमी पार्टीच्या चैतर वसावा यांचा ८५,६९६ मतांनी पराभव केला. अहमदाबाद पूर्वमधून एचएस पटेल ४.६१लाख मतांनी विजयी झाले. अहमदाबाद पश्चिममधून दिनेश मकवाना २.८६ लाख मतांनी, हरिभाई पटेल महेसाणामधून ३.२८ लाख मतांनी तर जुनागढमधून राजेश चुडासामा १.३५ लाख मतांनी विजयी झाले.

# मोदींच्या सभा झालेल्या बहुतेक मतदारसंघांमध्ये महायुती पराभूत

● मुंबई, प्रतिनिधी :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात तब्बल १८ सभा घेऊनही महायुतीच्या अनेक उमेदवारांना पराभवाची चव चाखावी लागली आहे. मोदी यांनी मुंबईत शिवाजीपार्कवर १७ मे रोजी मोठी प्रचारसभा घेतली आणि तत्पूर्वी दोन दिवस आधी घाटकोपरमध्ये रोड शोही केला. मात्र मुंबईत महायुतीला मोठा फटका बसला.

मोदी यांनी २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत जवळपास दुप्पट म्हणजे १८ प्रचारसभा राज्यात घेतल्या. यंदा पाच टप्प्यात निवडणूक झाल्याने प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला आणि मोदी यांच्या प्रचारसभा अधिक झाल्या व सहकारी पक्ष शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या उमेदवारांसाठीही मोदी यांच्या सभा झाल्या, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. मात्र



राज्यात महाविकास आघाडीचा जोर पाहता अनेक जागा धोक्यात होत्या व त्यासाठी मोदी यांच्या सभा घेतल्यावर वातावरण बदलण्याची शक्यता महायुतीच्या नेत्यांना वाटत होती. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. मुंबईत महायुतीचे सहाही उमेदवार निवडून येतील, असा ठाम विश्वास फडणवीस, मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार व्यक्त करीत होते. मात्र चुरशीची लढाई होऊन महायुतीचा पराभव झाला.

मोदी यांच्या दोन-तीन लोकसभा मतदारसंघांसाठी एक अशी सभा झाली होती. मोदी यांच्या १८ सभांचा आढावा घेता चंद्रपूर येथे सभा होऊनही मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा पराभव झाला. नागपूरला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी मात्र विजयी झाले. रामटेक मतदारसंघातून राजू पारवे (शिंदे गट) यांना काँग्रेसचे श्यामकुमर बर्वे यांनी पराभूत केले. वर्ध्यातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अमर काळे यांनी भाजपच्या रामदास तडस यांचा पराभव केला. परभणीतून राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर विजयी होऊ शकले नाहीत. नांदेडमध्ये भाजपच्या प्रतापराव चिखलीकर याचा पराभव झाला. कोल्हापूरला शिवसेना (शिंदे गट) उमेदवार संजय मंडलिक यांना काँग्रेसचे उमेदवार छत्रपती शाहू महाराज यांनी पराभूत केले. सोलापूरमध्ये काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी मोठ्या मताधिक्याने भाजपचे राम सातपुते यांना पराभूत केले. माढ्यात रणजितसिंह निंबाळकर पराभूत झाले.धाराशिवमधून भाजपच्या अर्चना पाटील यांचा पराभव करीत शिवसेना ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर विजयी झाले, तर लातूरमध्ये भाजपच्या सुधाकर श्रृंगारे यांचा पराभव झाला. अहमदनगरमध्ये चुरशीच्या लढाईत सुजय विखे पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नीलेश लंके यांनी पराभव केला. नंदूरबारमध्ये भाजपच्या हीना गावित यांना काँग्रेसचे गोवाळ पाडवी यांनी अनपेक्षितपणे पराभूत केले. केंद्रीय मंत्री भारती पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे भास्कर भगरे यांनी पराभूत केले. मोदी यांची पुण्यात पुणे, बारामती, मावळ व शिरुर अशा चार मतदारसंघांसाठी सभा झाली होती. पुण्यातून भाजपचे मुरलीधर मोहोळ विजयी झाले, पण बारामतीतून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांनी पराभव केला.

# साताऱ्यात रिपाईच्या तुतारीने श्री. छ. खा उदयनराजेंच्या कपाळी गुलाल

● सातारा, प्रतिनिधी :

सातारा लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीचा निकाल नुकताच लागला. या निकालाने कभी खुशी... कभी गम..... साताऱ्यात दिसून आले . महायुतीचे उमेदवार श्री छ खा उदयनराजे भोसले यांच्या विजयाचे शिल्पकार पडद्यामागे आहेत. पण, खऱ्या अर्थाने रिपाईच्या तुतारीने म्हणजेच संजय गाडे यांच्या उमेदवारीने श्री छ खा उदयनराजे यांच्या कपाळी गुलाल लागला. राजेंची मोहीम फत्ते करणाऱ्या या भूमिकेचे सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला आहे

सातारा लोकसभेच्या निवडणुकीत मतमोजणी केंद्रामध्ये पहिल्या फेऱ्यामध्ये महाविकास आघाडीचे शशिकांत शिंदे यांनी आघाडी घेतली होती. त्यामुळे सातारा शहरासोबतच परिसरात चांगलीच धाकधुकी वाढली होती. सातारा शहर परिसरात सर्वत्र



शुकशुकाट जाणवत होता.

पोलीस यंत्रणा व जिल्हा प्रशासनाने लागू केलेले १४४ कलम तसेच मिरवणुकीवर बंदी घातली होती. चौका चौकात पोलीस बंदोबस्त असल्यामुळे या परिसरामध्ये छावणीचे स्वरूप असले तरी दुपारपर्यंत रस्त्यावर समर्थक व कार्यकर्ते दिसत नव्हते. मात्र, दुपारनंतर महायुतीचे श्री. छ. खा. उदयनराजे भोसले यांनी तेराव्या फेरीत १०२५ मताची आघाडी घेतली .हे जाहीर होताच अनेक सार्वजनिक ठिकाणी समर्थकांनी गर्दी करण्यास सुरुवात केली होती.ही गर्दी आणि आघाडी जसजशी वाढेल तसतसे साताऱ्च्या पोलीस यंत्रणा सुद्धा कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयश आले .पोलिसांना अक्षरशः बग्याची भूमिका घ्यावी लागली . चार चाकी व दुध चाकी च्या टपावर बसून तर काही जण जयघोष करत रस्त्यातच गुलाल उधळत होते. एवढेच नव्हे तर पवई नाका या ठिकाणी जेसीबी बोलून रस्ता अडवून गुलालाची उधळण केली जात होती. सोबत डी.जे चा दणदणाट आवाज सर्वत्र चांगलाच घुमू लागला होता. श्री छ खा भोसले समर्थकांनी मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला. त्यावेळेला श्री छ खा उदयनराजे भोसले यांनी सुद्धा समर्थकांना चांगलीच दाद दिली. सातारा लोकसभा मतदारसंघात महायुतीला मतमोजणीत आघाडी मिळण्यापूर्वी भाजपचे कार्यालयामध्ये शांतता पसरली होती. तर दुसऱ्या बाजूला उमेदवारांचे प्रतिनिधी व श्री छ खा भोसले यांचे कट्टर समर्थक श्री दत्ता बनकर व त्यांचे सहकारी हे मतमोजणी केंद्रात विजयमुद्रेने सर्वत्र वावरत होते. अखेर मतमोजणीच्या प्रक्रियेमध्ये फेऱ्या वाढत असताना श्री. छ. खा. भोसले यांची मताची आघाडी सुद्धा वाढू लागली . रिपाई गवई गटाचे मतदान यंत्रणेमध्ये नऊ क्रमांकावर असलेले उमेदवार संजय कोंडीबा गाडे यांना पहिल्या फेरीत १८४५ मते तर श्री छ खा उदयनराजे भोसले यांना सत्तावीस हजार पाचशे छप्पन व शशिकांत शिंदे यांना २७,९०७ हजार मत पडली होती. त्यानंतर प्रत्येक फेरीमध्ये उदयनराजे व संजय गाडे यांचे मताधिक्य वाढत असल्याने उदयनराजे भोसले यांना निवडणूक सोपी जाऊ लागली.

# पालघरमध्ये कसा झाला भाजपचा विजय ? वाचा न माहीत असलेली इनसाइड स्टोरी

● पालघर, प्रतिनिधी :

पालघर मध्ये गेल्या सहा वर्षांपासून भाजपचा ना आमदार ना खासदार असे चित्र असतानाही आज भाजपने पालघरच्यांजागेवर मिळवलेला विजय म्हणजे त्यांनी आयात उमेदवार डावलून कार्यकर्त्याला दिलेली उमेदवारी आणि शेवटच्या टप्यात झालेल्या अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या झालेल्या प्रचार सभेचा फायदा भाजपला झाल्याचे आजच्या निकालावरून दिसून येत आहे. पालघर लोकसभेसाठी सगळयात पहिला उमेदवार हा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने जाहीर केला तर त्या नंतर बहुजन विकास आघाडीने पण महायुतीत हि जागा कोण लढवणार याचा तिढा सुटता सुटत नव्हता. उमेदवारी अर्ज भरण्याच्या दोन दिवस अगोदर हि जागा भाजपसाठी सोडण्यात आली.

त्यावेळी पालघरमधील शिवसेनेचे विद्यमान खासदार गजेंद्रगावित हे हाती कमळ घेऊन निवडणूकलढविण्यास उत्सुक होते. परंतु राज्य नेतृत्वाने या ठिकाणी पक्षाचा कर्यकर्ता निवडणुकीला उतरविल्याने त्याचा फायदा भाजपला झाला आहे. आयात उमेदवाराला स्थानिक कार्यकर्त्यांनी विरोध दर्शवला होता. ऍड. चिंतामण



वनगा आणि विष्णू सावरा यांच्या नंतर याठिकाणी भाजपचे मोठे नेतृत्व निर्माण झाले नव्हते. त्या पार्श्वभूमीवर हि निवडणूक झाली होती. लोसभा मतदार संघात पक्षीय बळ बघायला गेल्यास भाजपकडे एकही आमदार नव्हता. एक आमदार होता तो एकनाथ शिंदेच्या शिवसेनेकडे तर पाच आमदार हे विरोधकांकडे होते. त्यामुळे हि निवडणूक भाजपला पालघरमध्ये उभे राहण्यासाठी तशी सोपी नव्हती. एका बाजूला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे असलेली सहानुभूतीची लाट आणि त्याबरोबरच डहाणू आणि विक्रमगड मधील दोन आमदार यांच्या बरोबर लढत तर दुसर्या बाजूला वसई,नालासोपारा, आणीबाईसार ये तीन मतदार संघावर ज्यांचे वर्चस्व आहे त्या बहुजन विकास आघाडीशी लढत त्यातही पालघर लोकसभा मतदार संघात या ३ मतदार संघात सगळयात जास्त मतदार संख्या असल्याने त्याची जुळवाजुळव यातून मार्ग काढत भाजपने सहा वर्षा नंतर पुन्हा पालघरची जागा आपया कडे खेचून घेण्यात यश मिळविले आहे. पालघर मध्ये भाजपची झालेली पीछेहाट आणि आता आलेली निवडणूक यातून कार्र्यकर्त्यांना बूस्टर देण्याचे आणि या मतदार संघात कमळ फुलविण्याचेकाम निवडणुकीच्या अंतिम तोपर्यंत कोणी केले असेल तर ते देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्य नाथ यांच्या जाहीर सभेने वसई मध्ये असलेल्या गुजराथी समुदायाला अमित शहानी हाक दिली तर योगिनी उत्तर भारतीयांना त्याचा फटका बसला तो बहुजन विकास आघाडीला हा पक्ष पुन्हा एकदा निवडणुकीत तिसर्या क्रमांकावर गेला. यातच भाजपला टक्कर देईल असे वाटणार्या बहुजन विकास आघाडीला उद्धव ठाकरे गटाने त्यांच्या विरोधात केलेल्या प्रचाराचाही फटका बसला. बहुजनच उमेदवार निवडून आल्यास तो मोदींना मदत करेल या प्रचाराचा फटका बहुजनच्या मुस्लमान मताला बसला आणिफायदा मात्र झाला तो भाजपला, ख्रिचन आणि मुसलमानांची मते भाजपला कधीच मिळत नाहीत ती मते यावेळी उद्धव ठाकरेच्या उमेदवाराला गेली.